follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

RNI Regd No.72105/99 ※ वर्ष २५ ※ अंक २८० ※ सातारा ※ सातारा ※ शनिवार ※ दि. २२ जून २०२४ ※ पाने ८ ※ किंमत ५ रू/

# ओबीसी शिष्टमंडळासंबंधी काय झाले निर्णय ?

**मुंबई :** खोट्या कुणबी दाखल्यांच्या तसेच इतर मुद्द्यांवरून वडीगोद्री येथे ओबीसी नेते प्रा.लक्ष्मण हाके यांनी गेल्या ९ दिवसांपासून उपोषण सुरू केले आहे. या पार्श्वभूमीवर सहयाद्री अतिथीगृह येथे आज उच्चस्तरीय बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, मंत्री छगन भुजबळ, अतुल सावे, उदय सामंत, गिरीश महाजन, धनंजय मुंडे यांच्यासह पंकजा मुंडे, प्रकाश शेंडगे, गोपीचंद पडळकर, वडीगोद्री-जालना आदी भागांतील ओबीसी समाजाचे नेते-कार्यकर्ते उपस्थित होते.या बैठकीला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह ओबीसी नेते उपस्थित होते. यात छगन भुजबळ, पंकजा मुंडेंसह लक्ष्मण हाकेंचं शिष्टमंडळ बैठकीला उपस्थित होते.

मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, असे आश्वासन राज्य सरकारने दिले आहे. तसेच सगेसोयरेंना आरक्षण देण्यास आमचा विरोध आहे. त्याबाबत येत्या पावसाळी अधिवेशनादरम्यान सर्वपक्षीय



बैठक घेऊन निर्णय घेण्यात येईल. ओबीसी, ईडब्ल्यूएस, एसईबीसी हे सर्व दाखले आधार कार्डाशी जोडण्यात येतील. तसेच मराठा समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी जशी मंत्र्यांची समिती आहे तशीच समिती ओबीसी-भटक्या समाजासाठीही तयार करण्यात येईल, अशी माहिती राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री तसेच ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी शुक्रवारी येथे दिली.

तसेच खोटे कुणबी दाखले देणारा आणि घेणारा दोघेही गुन्हेगार असून अशी प्रकरणे आढळल्यास त्यावर कारवाई करण्याचे आश्वासन आजच्या बैठकीत सरकारने दिले आहे. मी तसेच माझ्यासोबत सात ते आठ मंत्र्यांचे शिष्टमंडळ शनिवारी वडीगोद्री येथे जाऊन प्रा. लक्ष्मण हाके यांना उपोषण मागे घेण्याची विनंती करणार असल्याचेही छगन भुजबळ यांनी सांगितले. दरम्यान, जातीनिहाय जनगणनेच्या आमच्या मागणीला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही पाठिंबा दिल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

या बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी बोलताना छगन भुजबळ म्हणाले, मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात येणार नाही. कायद्याला देखील ते मान्य होणार नाही असे आश्वासन आम्हाला सरकारतर्फे

## वडीगोद्रीला मंत्र्यांचे शिष्टमंडळ जाणार


**आजच्या बैठकीत जे निर्णय झाले आहेत त्याची माहिती शनिवारी आपण वडीगोद्री येथे जाऊन लक्ष्मण हाकेंना देणार आहोत. माझ्यासोबत सात ते आठ मंत्र्यांचे शिष्टमंडळ असणार आहे. लक्ष्मण हाकेंनी उपोषण मागे घ्यावे अशी विनंती त्यांना करू. तसेच अधिवेशन काळात जी बैठक होणार आहे त्या बैठकीला हाकेंनी उपस्थित रहावे, अशी विनंती त्यांना आम्ही करू असेही भुजबळ म्हणाले.**

देण्यात आले आहे. जातीची खोटी प्रमाणपत्रे कोणालाही दिली जाणार नाहीत. खोटे कुणबी दाखले दिले असतील तर ते तपासण्यात येतील. खोटी प्रमाणपत्रे देणारे आणि घेणारे हे दोघेही गुन्हेगार असून त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल. काही जण अनेक वेळा वेगवेगळे दाखले काढून फायदे घ्यायला बघतात. ओबीसी, ईडब्ल्यूएस,एसईबीसी असे सगळयातून फायदे घेतात. हे सर्व दाखले आधार कार्डाला जोडण्याचे काम करण्यात येईल. जेणेकरून एक व्यक्ती एकाच योजनेचा फायदा घेऊ शकेल. सगेसोयरेमध्ये अनेक त्रुटी आहेत. प्रमाणपत्र कसे द्यावे, जातपडताळणी कशी करावी यासंदर्भात पूर्ण माहिती असणारे एक पुस्तकच आहे. त्याप्रमाणे सगळयाची पूर्तता करून प्रमाणपत्र देण्यात येते. अधिवेशन काळात सर्वपक्षीय नेत्यांची एक बैठक घेऊन सगेसोयरेबाबत काय करायचे याचा निर्णय घेण्यात येईल. सगेसोयरेंचा प्रश्न सर्वपक्षीय नेत्यांना विश्वासात घेऊनच सोडविण्यात येईल. मराठा समाजावर तसेच ओबीसी, भटक्या समाजावर अन्याय होऊ देणार नाही, असे आश्वासन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिल्याचे छगन भुजबळ म्हणाले.

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी आपण छगन भुजबळ यांचे राजकीय जीवन उदध्वस्त करू असा इशारा दिला आहे. त्यावर कोणाचेही राजकीय जीवन ही जनता उदध्वस्त करू शकते, कोणा एका-दुस-या माणसाचे ते काम नाही. आमच्या सोबत जनतेचा भरपूर आशीर्वाद आहे, असे भुजबळ यांनी

# पोर्शे प्रकरणी बिल्डर विशाल अगरवालला जामीन; दुसऱ्या गुन्ह्यात पुन्हा अटक





**पुणे :** पुण्यातील कल्याणीनगरच्या पोर्शे कार अपघात प्रकरणी अटकेत असलेला बिल्डर विशाल अगरवालला सत्र न्यायालयाने आज जामीन मंजूर केला. यानंतर लगेचच पोलिसांनी पाच वर्षांपूर्वीच्या गुन्ह्यात अगरवालला अटक केली आहे.

मद्यधुंद अवस्थेत असलेल्या बिल्डर बाळाने भयानक स्पीडने पोर्शे कार चालविली होती. यामध्ये त्याने चार पाच वाहनांना धडक दिली होती. यात मोटारसायकलवरून जाणाऱ्या तरुण, तरुणीला त्याने उडविले होते. या धडकेत दोघांचाही जागीच मृत्यू झाला होता. बिल्डर बाळाला वाचविण्यासाठी पिता विशाल अगरवालने आमदारालाही पोलीस ठाण्यात पाचारण केले होते.

या १७ वर्षीय अल्पवयीन मुलाला वाचविण्यासाठी पोलिसांनीही कसोशीने प्रयत्न केले होते. त्याची दारु पिऊन असल्याची चाचणी मुद्दाम उशिराने घेण्यात आली होती. यामुळे बिल्डरचे बाळ दारु पिलेला नव्हता असा अहवाल आला होता. यावरून पोलिसांची नाचक्की होऊ लागताच उपमुख्यमंत्र्यांना पुण्यात धाव घ्यावी लागली होती. यानंतर बिल्डर बाळाचे रक्ताचे नमुने घेण्यात आले होते. त्यातही बिल्डरने आपली ओळख आणि पैसा लावून रक्त बदलले होते. बिल्डर बाळाच्या आईचे रक्त देण्यात आले होते.

एवढे सगळे करूनही काँग्रेसचे आमदार रविंद्र धंगेकर आणि पुणेकरांनी विषय लावून धरल्याने बिल्डरला अटक झाली होती. हा बिल्डर छत्रपती संभाजीनगरला लपून बसला होता. यानंतर विशाल अगरवालच्या वडिलांनाही अटक झाली होती. यानंतरचे अगरवाल कुटुंबियांचे एकेक प्रताप समोर येत गेले तशी बिल्डर बाळासाठी अश्रू गाळणाऱ्या आईलाही अटक झाली होती. अशाप्रकारे सर्व अगरवाल कुटुंबच तुरुंगात गेले होते.

दरम्यान, आज विशाल अगरवालला जामीन मिळाला आहे. यानंतर कोंढवा पोलिस ठाण्यात नवीन गुन्हा नोंदवर अगरवालला पुन्हा अटक करण्यात आली आहे. लष्कर न्यायालयात हजर केले असता पाच वर्षांपूर्वी घटना घडली परंतु आत्ता फिर्याद दिली आहे, फक्त अगरवाल कुटुंबाला त्रास देण्यासाठी खोटा गुन्हा फिर्यादीने दाखल केला आहे, असा युक्तीवाद करत अगरवालच्या वकिलांनी पोलिसांनी केलेल्या पाच दिवसांच्या पोलीस कोठडीच्या मागणीला विरोध केला. यामुळे कोर्टाने न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. आता या कोठडीवरून उद्या जामीन अर्ज दाखल केला जाणार आहे.

# ममता वायनाडमध्ये प्रियांका गांधींसाठी प्रचार करण्याची शक्यता

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीपूर्वी मोदींविरोधात एकवटलेले विरोधक जेव्हा जागा वाटपाची वेळ आली तेव्हा सोंगट्यांसारखे विखुरले होते. यात पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीममता बॅनर्जीपहिल्या होत्या. ममतांनी प. बंगालमध्ये एकट्याने लढण्याची घोषणा केली होती.काँग्रेसविरोधातउमेदवार देत निवडणूक लढविली होती. आता याचममता बॅनर्जीवायनाडमध्ये प्रियांका गांधींसाठी प्रचाराला जाणार असल्याचे वृत्त आहे.

लोकसभा





निवडणुकीतकाँग्रेसच्यानेत्यांनी आणि तृणमूलच्या नेत्यांनी एकमेकांविरोधात गरळ ओकली होती. निवडणुकीनंतरही काही फारसे दोन्ही पक्षांत आलबेल नाही. ममतांनी काँग्रेसच्या खासदारालाही पाडले. आजही पश्चिम बंगालमधील काँग्रेसचे नेते ममतांवर तोंडसुख घेत आहेत. अशातच ममता गांधींच्या प्रचाराला वायनाडला जाणार असल्याच्या वृत्ताने राजकीय वर्तुळात सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. काही दिवसांपूर्वी ममता यांनी भाजपाच्या खासदाराची भेट घेतली होती. तेव्हा ममता एनडीएसोबत जाऊन खेळ करतात की काय अशी देखील चर्चा होती. यानंतर वायनाडमध्येप्रियंका गांधींचीउमेदवारी जाहीर होताच माजी अर्थमंत्री पी चिदंबरम यांनी ममतांची भेट घेतली आहे. यावेळी त्यांनी ममतांनी वायनाडमध्ये काँग्रेसचा प्रचार करावा, अशी विनंती केल्याचे सुत्रांनी प्रसारमाध्यमांना सांगितले आहे.

## काँग्रेसचा मोदी सरकारवर गंभीर आरोप


**मुंबई :** दरवर्षी शेकडो/ हजारो भारतीय परदेशात स्थलांतरित होतात. आता याच मुद्द्यावरुनकाँग्रेसचेसरचिटणीस जयराम रमेश यांनी केंद्र सरकारवर निशाणा साधला आहे. सोशल मीडिया पोस्टद्वारे त्यांनी सांगितले की, २०२२ मध्ये २ लाख २६ हजार भारतीयांनी आपले नागरिकत्व सोडले आहे. हा आकडा २०११ मधील १ लाख २३ हजार पेक्षा दुप्पट आहे.-ऊ्तएठढखडएचएछ्ढ्रुशीशव लूकाँग्रेसनेते जयराम रमेश यांनी आरोप केला की, एका जागतिक गुंतवणूक स्थलांतर सल्लागार फर्मने खुलासा केलाय की, गेल्या तीन वर्षांत १७,००० हून अधिक करोडपती भारतीयांनी देश सोडला आहे. या लोकांची एकूण संपत्ती दहा लाख डॉलर्सपेक्षा जास्त आहे. याचे कारण म्हणजे भारतीय कॉर्पोरेट्स देशातील कर धोरण आणि मनमानी करांमुळे गेल्या १० वर्षांपासून भीतीचा सामना करत आहेत.भारतातील मोठ-मोठे उद्योगपती देश सोडून सिंगापूर, यूएई, ब्रिटनसह इतर ठिकाणी स

थायिक होत आहेत. अशा प्रकारचे स्थलांतर ही चिंतेची बाब आहे, अशी टीका त्यांनी केली.स्थलांतराच्या बाबतीत भारत तिसऱ्या क्रमांकावर

आंतरराष्ट्रीय गुंतवणूक स्थलांतर सल्लागार फर्म क्षपश्रशू झर्रींपशीं च्या अहवालानुसार, २०२४ मध्ये ४,३०० करोडपती भारतीय देश सोडून जातील आणि हे लोक ण-ए मध्ये स्थायिक होऊ शकतात. करोडपतींच्या स्थलांतराच्या बाबतीत भारत, चीन आणि ब्रिटननंतर तिसऱ्या क्रमांकावर आहे.

# महायुती सरकारने भ्रष्टाचाराच्या सर्व सीमा ओलांडल्या

## अटल सेतुला भेगा, नाना पटोलेंची टीका





**पुणे :** महायुती सरकारच्या भ्रष्टाचारावर पावसाळी अधिवेशनात आवाज उठवणार असल्याचे नाना पटोले यांनी म्हटले आहे. महायुती सरकारने भ्रष्टाचाराच्या सर्व सीमा ओलांडल्या; अटल सेतुला भेगा, नाना पटोलेंची टीकाउेपसीर्शी छरपर झर्रीश्रश छ्शुी:पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते ज्या अटल सेतुचे उद्घाटन करण्यात आले त्या रस्त्याला अवघ्या तीन महिन्यातच भेगा पडल्या आहेत. नवी मुंबईकडील एका भागात अर्धा किलोमीटरपर्यंत रस्ता एक फुट खाली खचला आहे. महायुती सरकारने भ्रष्टाचाराच्या सर्व सीमा ओलांडल्या आहेत. कर्नाटकातील आधीचे भाजपा सरकार ४० टक्के कमिशनवाले होते पण महायुती सरकार तर १०० टक्के कमीशनखोर आहे, असा गंभीर आरोप महाराष्ट्र प्रदेशकाँग्रेसकमिटीचे अध्यक्षनाना पटोलेयांनी केला आहे.

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेयांनी प्रसार माध्यमांच्या प्रतिनिधींबरोबर अटल सेतुची पाहणी करून रस्त्याला भेगा पडल्याचे निदर्शनास आणून दिले. शिवडी न्हावा शेवा प्रकल्पावर राज्य सरकारने १८ हजार कोटी रुपये खर्च केला असून यासाठी बँकेकडून कर्ज काढले आहे. हा काही विकास नाही तर भ्रष्टाचार असून सरकार स्वतःची घरे भरत आहे आणि जनतेच्या जीवाशी खेळत आहे. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांचे नाव या प्रकल्पाला दिले आहे, त्यांच्या नावाने भ्रष्टाचार करणे हे दुर्भाग्यपूर्ण आहे, अशी टीका नाना पटोले यांनी केली.उच्च न्यायालयाने या सर्व घटनांमध्ये स्वतः लक्ष घालावेया प्रकल्पाचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले, उद्घाटनाआधी त्यांनी या प्रकल्पाची व्यवस्थित पाहणी तरी करायला हवी होती. पण नरेंद्र मोदी हेच देशातील भ्रष्टाचाराचे सरदार आहे. सर्व भ्रष्टाचाऱ्यांना ईडी, सीबीआयचा धाक दाखवून भाजपात घेऊन मंत्री बनवतात. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी पर्यावरणाचे सर्व नियम धाब्यावर बसवून मोठ्या प्रमाणात खारफुटीची कत्तल करण्यात आली आहे, एक टेकडीही फोडली असून पर्यावरणाचा ऱ्हास केला आहे. वसईच्या खाडीत पाईप लाईनचे काम सुरु असताना एक गरिब कामगार २० मीटर खाली दबला गेला, त्याच्यावर हजारो किलो लोखंड पडले. उ

# लोकसभेला जास्त जागा मिळायला हव्या होत्या, पण मविआ ऐक्यासाठी दोन पावले मागे आलो: शरद पवार

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीनंतर आता विधानसभेच्या तयारीला सर्वच पक्ष लागल्याचे पाहायला मिळत आहे. एकीकडे ओबीसी आणि मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय वातावरण तापल्याचे पाहायला मिळत असताना दुसरीकडे आगामी विधानसभा निवडणुकांसाठी पक्षांची चाचपणी सुरू असून, बैठकांचे सत्र सुरू आहे. या घडामोडींच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेसशरदचंद्र पवार गटाचे प्रमुखशरद पवारयांनी केलेल्या एका विधानामुळे राजकीय वर्तुळात चर्चा सुरू झाल्याचे सांगितले जात आहे.



लोकसभा निवडणुकीनंतर जागावाटपावरून महायुतीत तणाव पाहायला मिळत आहे. आताशरद पवारयांनी केलेल्या विधानामुळे महाविकास आघाडीत जागा वाटपावरून सर्वकाही आलबेल नव्हते का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. लोकसभा निवडणुकीत आपल्या पक्षाला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. परंतु, त्यावेळी महाविकास आघाडीचेऐक्य टिकून राहावे, यासाठी दोन पावले मागे आलो, असे शरद पवार यांनी म्हटले आहे. शरद पवार गटाच्या नवनिर्वाचित खासदारांची पुण्यातील निसर्ग हॉटेलला आज बैठक झाली. या बैठकीत शरद पवार, जयंत पाटील आणि सर्व नवनिर्वाचित खासदार उपस्थित होते.

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली. आपण एकत्रित राहिलो म्हणून लोकसभा निवडणुकीत यश मिळालेआपण एकत्रित राहिलो म्हणून लोकसभा निवडणुकीत यश मिळाले.

आता विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागा. आपल्याला राज्य हातात घ्यायचे आहे, याची तयारी ठेवा. त्यासाठी लोकांची जास्तीत जास्ते काम करा. राज्यातील लोकांचा दिल्लीशी फारसा संबंध येत नाही. राज्यात जास्त प्रश्न असतात. त्यामुळे विधानसभा निवडणुकीच्या कामाला लागा, असे शरद पवार यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले. दरम्यान, इंडिया आघाडी आणि महाविकास आघाडीत कुठलीही गडबड होऊ नये, यासाठी शरद पवारांनी लोकसभेला कमी जागांवर समाधान मानले.

# नाफेड'मध्ये कांदा घोटाळा; अध्यक्षांनीच केला पर्दाफाश

**नाशिक :** अधिकारी व व्यापारी यांची साखळी तयार होऊन नाफेडच्या माध्यमातून शेतकऱ्यांची होत असलेली फसवणूक तसेच 'नाफेड'शिवाय 'एनसीसीएफ'च्याकांदाखरेदी केंद्रांवर शेतकऱ्यांनी फिरविलेली पाठ याचा पंचनामा नाफेडचे अध्यक्ष जेठाभाई अहीर यांनी केला. त्यांनीनाशिकजिल्ह्यातील नाफेडच्याकांदाखरेदी-विक्री केंद्रांवर अचानक पाहणी केली. या पाहणीत त्यांना अनेक दोष आढळून आले. अध्यक्षांकडून कांदा खरेदी केंद्रांची पाहणी होत असल्याची भनक नाफेडशिवाय कृषी अधिकाऱ्यांनाही लागली नाही.-ऊ्तएठढखडएचएछ्ढ्रुशीशव लूखासगी दौऱ्याचे कारण सांगून अध्यक्ष नाशिक जिल्हा दौऱ्यावर आले होते. देवळा येथील नाफेडच्या कांदा खरेदी केंद्रावर अध्यक्ष जेठाभाई अहीर शुक्रवारी सकाळी पोहोचले. त्यामुळे तेथे उपस्थित नाफेडच्या अधिकाऱ्यांची धावपळ उडाली.

**चौकशीत काय आढळले ?-**

शेतकऱ्यांकडून कांदा खरेदी न करता बाजार समितीतून कांदा खरेदी केला जात होता.

- ऑनलाइन कांदा खरेदी विक्रीमध्ये घोटाळा आहे का? याचे बारकावे अध्यक्षांनी तपासले.

- विक्रीस आलेल्या मालापेक्षा दुप्पट कांदा गोडावूनमध्ये आढळून आला.

- ५ ते ६ खरेदी केंद्रांवर चुकीच्या पद्धतीने काम सुरू असल्याचे दिसले.

- आधार कार्डवर शिक्के मारून ऑनलाइन खरेदी-विक्री व्यवहारात गडबडीचा संशय.

- कांदा खरेदी-विक्री व्यवहारात दलाली होत असल्याचा अध्यक्षांना संशय.आतापर्यंत खरेदी केलेल्या कांद्याचा हिशेब अध्यक्षांनी तपासला. तसेच शेतकऱ्यांचा प्रतिसाद कमी का झाला? म्हणून अधिकाऱ्यांनाही जाब विचारला.चौकशीसाठी कमिटी नेमणार

नाफेडच्या खरेदी केंद्रांवर काही दोष आढळून आल्याने संपूर्ण चौकशीसाठी कमिटी नेमण्यात येणार आहे. त्यानुसार कमिटी आपला अहवाल सादर करेल.

## संपादकीय

# पर्यटकांनो सावधान!

पावसाळा सुरू झाला की, दरडी कोसळणे, डोंगरांचा भाग ढासळणे, नदी-नाले, ओढे यांना पूर येणे, पुलावरून पाणी वाहणे, रस्ते खचणे असे प्रकार नेहमीच घडत असतात. नैसर्गिक आपत्तीसोबत चालकांना असलेले वेगाचे आकर्षण यामुळे पावसात गाड्या 'स्लीप' होणे, पर्यायाने वाहनाचे अपघात होणे अशा घटनांमध्येही वाढ होत असते. कल्याण-नगर मार्गावरील ठाणे व पुणे जिल्ह्याच्या मध्यभागी अगदी सीमारेषेवर असणारा माळशेज घाट दरडी पडण्यासाठी (कु) प्रसिद्धच आहे. माळशेज घाटात दरवर्षी दरडी ढासळण्याच्या, रस्ते खचण्याच्या घटना घडतच आहेत. पावसाळा कालावधीत होणाऱ्या नैसर्गिक आपत्ती रोखण्यासाठी महाराष्ट्र सरकारकडून दरवर्षी घाट परिसरातील रस्त्याची कामे मोठ्या प्रमाणावर केली जातात. घाटाला लोखंडी जाळीला कव्हर करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत. नुकतीच पावसाला सुरुवात झालेली आहे.

पावसाने अजून जोर पकडला नसला तरी माळशेज घाटामध्ये मात्र दरडी कोसळण्याच्या घटनेने सलामी दिलेली आहे. बुधवारी पहाटे कल्याणवरून अहमदनगरला जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्गावरील माळशेज घाटात मोठी दुर्घटना घडली. मागील काही दिवसांपासून या भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. महामार्गावरून जात असताना रिक्षावर अचानक डोंगरकडा पडला. त्यामुळे या अपघातात दोनजण जागीच ठार झाले आहेत. घाटात पर्यटनांसाठी दरवर्षी वाढणारी पर्यटकांची गर्दी व त्यातून घडणाऱ्या घटनादेखील कायदा व सुव्यवस्थेला बाधा आणतातच; परंतु शांततामय पर्यावरणामध्ये गोंधळ, कोलाहल यामुळे त्या परिसरात घातल्या जाणाऱ्या गोंधळाने तेथील शांततेलाही बाधा आणतात. पाऊस सुरू झाल्यावर माळशेज घाटाकडे पर्यटकांची पावले मोठ्या प्रमाणावर वळतात. एकीकडे डोंगररांगा तर दुसरीकडे नजरेतही न सामावणारा खोलगट भाग, झाडी, निसर्गसौंदर्य, वन्य प्राण्यांचे दर्शन यामुळे माळशेज घाट वर्षानुवर्षे पर्यटकांची गर्दी वाढतच चालला आहे.

पर्यटकांनी निसर्गाचा आनंद घेतला, धबधब्याखाली पाण्याचे फवारे अंगावर घेणे हा पर्यटनाचा, पावसाळी सहलीचाच एक भाग झाला. पण सोबतीला दारू घेऊन जाणे, दारूच्या पार्ट्या करणे, गोंधळ घालणे, सेल्फीच्या नादात नको ते जीवघेणे प्रकार करणे हा सहन करण्यापलीकडचा भाग आहे. पावसाळा कालावधीत डोंगर ढासळतो, दरडी कोसळतात. हे मार्गदर्शनपर फलक असतानाही पर्यटक आपणाला हवे आहे तेच करतात व अपघाताला निमंत्रण देतात. त्यामुळे निसर्गसौंदर्याने बहरलेला माळशेज घाट पावसाळा कालावधीत अपघाताच्या घटनांनी कलंकित होऊ लागला आहे, या घाटाची प्रतिमा जनसामान्यांमध्ये मलीन होऊ लागली आहे. या ठिकाणी ठाणे जिल्ह्याच्या बाजूने मुरबाड पोलीस व घाट माथ्यावरून ओतूर पोलीस बंदोबस्ताला असले तरी पर्यटकांच्या संख्येपुढे हा बंदोबस्त अगदी तोकडाच पडतो. तसेच पर्यटक झुंडीने असल्याने व त्यातही काही महाभाग दारूच्या आहारी गेल्याने भांडणे हा नित्याचाच एक भाग झाला आहे.

रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील खारघर येथील पांडवकडा हा अलीकडच्या दशकभराच्या कालावधीत नावारूपाला आलेले पर्यटन स्थळ आहे. नवी मुंबई, पनवेल, उरणपासून हाकेच्या अंतरावर तसेच मुंबई, ठाणे, कल्याणपासून अवघ्या तासाभराच्या अंतरावर असणारे पांडवकडा हे वनडे सहलीसाठी उपयुक्त पर्यटन स्थळ आहे. पाऊस सुरू झाल्यावर तेथे वाहणारा धबधबा हा पर्यटकांसाठी आकर्षणाचा विषय आहे. तरुणाई मोठ्या संख्येने दररोज पांडवकडा परिसराकडे येत असते. शनिवारी, रविवारी पावसाळ्यात पांडवकडा परिसरात तरुणाईचा एक महोत्सवच भरलेला दिसून येतो. पांडवकडा धबधब्यामध्ये वरून पाण्यासोबत अनेकदा पडणारे दगड हे दुर्घटनेला निमत्रंण देत असतात. पांडवकडा या ठिकाणीही दारूच्या पार्ट्या होत असल्याने नकळत पाण्यासोबतची मस्ती मृत्यूला निमंत्रण देत असते. पर्यटनासाठी पांडवकडा परिसरात बंदी घातली तरी या बंदीला न जुमानता पर्यटक या ठिकाणी येतच असतात. खारघर पोलिसांचा या ठिकाणी बंदोबस्त असला तरी पर्यटकांच्या संख्येपुढे तो तोकडाच ठरतो. घाट, धबधबे या तुलनेत फॉर्म हाऊस, रिसोर्ट्स, हॉटेल व या ठिकाणी असणारे स्विमिंग पूल हा सुरक्षित पर्याय अनेकजण स्वीकारतात.

नवी मुंबई महापालिका मुख्यालयापासून उरणच्या दिशेने गेल्यावर काही अंतरावर दिघोडा परिसरातही नदीवर पर्यटकांची गर्दी वाढत चालली आहे. तेथील नदीवर जाऊन वाहत्या पाण्याचा आनंद घेण्यासाठी गेल्या दशकभराच्या कालावधीत येथेही गर्दी वाढू लागली आहे. टिटवाळा, बदलापूर, खडवली या ठिकाणी वाहणाऱ्या नद्यादेखील पर्यटकांना साद घालतच असतात. मुंबई-पुणे एक्स्प्रेस वेवर कोसळणारे पाण्याचे धबधबे अंगावर घेण्यासाठी चालक आपली वाहने बाजूला उभी करत असल्याने एक्स्प्रेस वेवर वाहतूक कोंडीच्या घटना घडतच असतात. याशिवाय पावसातील कोकण म्हणजे महाराष्ट्राच्या भूमीवर नंदनवनच आहे. पावसाळा सुरू झाला की वर्षासहलीपासून ते दुर्गभटकंतीपर्यंत स्वतःच्या कुवतीनुसार अनेक बेत रचले जातात. ठोसेघर, राजमाची, कोंढाणेलेणी, आंबोली, कास, कात्रज, सिंहगड, नाणेघाट, हरिश्चंद्रगड इ. भटक्यांची काही आवडीची ठिकाणे.

पावसामुळे डोंगर हिरवेगार झालेले असतात, डोंगरावरून धबधबे वाहत असतात, वेगवेगळ्या प्रकारच्या फुलांनी झाडे नटलेली असतात. सर्वत्र वातावरण कसे आल्हाददायक असते. अशा आल्हाददायक वातावरणाचा अनुभव घेत असतानाच अमूक ठिकाणी दरड कोसळल्यामुळे पर्यटकाचा मृत्यू, धबधब्याच्या प्रवाहाचा अंदाज न आल्यामुळे पर्यटक वाहून गेले, अशा घटनांनी पावसाळी पर्यटनाला अलीकडच्या काळात गालबोट लागण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत. अलीकडच्या काळात पावसाळा कालावधीत ट्रेकिंगच्या प्रकारातही वाढ झाली आहे. ट्रेकिंगला जाताना पाऊस, दाट धुके, उंच डोंगर, खोलदऱ्या, निसरड्या वाटा आणि चिखल यांचा विचार केला गेलेला असतो. कौटुंबिक सहलीसाठी आपण आपल्या परिवाराबरोबर अशा ठिकाणी वरील गोष्टी विचारात न घेता जाणे म्हणजे अपघाताला आमंत्रण देण्यासारखे आहे. ज्याप्रमाणे आपण पावसाळ्यात भटकंतीसाठी बाहेर पडतो, त्याचप्रमाणे अनेक सरपटणारे प्राणीपण बिळात पाणी शिरल्यामुळे बाहेर पडतात. त्यामुळे भटकंती करताना सरपटणाऱ्या प्राण्यांपासून विशेष काळजी न घेतल्यास सर्पदंशाने मृत्यू होण्याच्या घटनाही घडत असतात, पावसाळा कालावधीत आसंमत हा नव्याने कात टाकत असतो. मग अशा निसर्गात रममाण होताना काळजी घेतल्यास पाऊसाला व पर्यटनालाही गालबोट लागणार नाही.

# भोर विधानसभेतील धोकादायक गावे पुनर्वसनाच्या प्रतीक्षेत

## कोंढरी, धानवली, घुटके गावांचा समावेश

**भोर :** भोर विधानसभा मतदार संघातील भूस्खलनाचा धोका असलेल्या गावांची प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी वेळोवेळी आले, पाहणी केली, पुनर्वसन होणार अशी खात्री दिली, पुनर्वसन होणार ही आस लावून बसलेल्या कोंढरी, धानवली, घुटके ग्रामस्थांना मात्र पावसाळा सुरू झाला तरी पुनर्वसनासाठी प्रतिक्षाच करावी लागत असून कोंढरी, धानवली, घुटके गावच्या पुर्नवसन प्रस्तावाला मंजूरी मिळत नसल्याची बाब समोर आली असून सरकारकडे गेल्या दोन वर्षापासून ते धूळ खात पडले आहेत. त्यामुळे माळीन सारखी दुर्घटना घडल्या नंतरच शासनाला जाग येणार का..? असा संतप्त सवाल ग्रामस्थ उपस्थित करत आहेत.

तीनही गावांचे पुर्नवसन प्रस्ताव जिल्हा प्रशासनाने मंत्रालयात १८ मे २०२२ मध्ये सादर केले. या मार्च महिन्यात स्मरणपत्र दिले आहे. माळीणमधील दुर्घटनेनंतर जिल्ह्यातील एक हजार चारशे गावांचे भूजल पाहणी व विकास संचालनाय (जीएसडीए), भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जीएसआय) संस्थामार्फत सर्वेक्षण करण्यात आले. त्यामध्ये भोर तालुक्यातील कोंढरी, धानिवली व मुळशीतील घुटके गावांचे तात्काळ पुर्नवसन करावे अशा सूचना संबंधितांनी दिल्या.

**तालुक्यातील दरड' प्रवण क्षेत्र गावातील परिस्थितीवर प्रशासनाची बारकाईने नजर असून यंत्रणा सज्ज आहे. संबधीतांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. कोंढ रीतील लोकांना सुरईचा माळ तर धानिवलीतील लोकांना जवळच्या आश्रमात तात्पुरते स्थलांतरीत करणार आहे. पावसाळ्यापूर्वी संबधीतांना दोन महीणे पुरेल इतके रेशन व अत्यावश्यक सुविधा देण्यात येणार आहेत.**

**- सचिन पाटील, तहसीलदार भोर.**

गावांच्या भौगोलीक परिस्थिती नुसार कोंढरी, धानवली, घुटके ही गावे डोंगराळ भागात आहेत. तेथील जमिनीचा पृष्टभाग खडकाळ आणि कठीण असून लाल मातीचा आहे. भात हेच मुख्य पिक आहे. पावसाळ्यात संततधार किंवा अतिवृष्टी होते.

धानवलीत तब्बल सात, कोंढरीमध्ये आठ तर घुटकेमध्ये सात हजार पाचशे मिलीमिटर पाउस पडतो. डोंगरांना भेगा पडल्यामुळे पावसाळ्यात या गावांना धोका असून तेथील लोकांना तात्काळ स्थलांतरीत करावे असे पाहणीत सूचित केले आहे. सरकारकडून अद्यापपर्यंत कुठलाही ठोस निर्णय घेण्यात आला नसल्यामुळे यावर्षी देखील या गावांचे पुर्नवसन होणार नसल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

भोरपासून २५ किलोमीटर अंतरावर डोंगर भागाच्याखाली धोकादायक ठीकाणी कोंढरी गांव आहे. गावठाणाचे क्षेत्र एक हेक्टर सतरा गुंठे. कोंढाळकर वस्तीमध्ये ३२ तर सुरमाईचा माळ येथे १३ कुटंबे वास्तव्याला आहेत. दोन्ही ठिकाणी मिळून ३७७ प्रौढ तर ४३ लहान लोकसंख्या आहे.पुर्नवसनासाठी दोन हेक्टर ८१ गुंठे जमीन लागणार आहे. तेरा कोटी ८ लाख ३७. हजार रूपये खर्च अपेक्षित आहे.

**मंत्रालयात संबधीत विभागाचे सचिव, मंत्री यांना वारंवार भेटून पाठपुरावा केला आहे. तीनही प्रस्ताव मुख्यमंत्र्यांकडे मंजूरीच्या अंतिमटप्प्यात आहेत.**

**- संग्राम थोपटे**

**आमदार. भोर विधानसभा**

भोरपासून ३९ किलोमीटरवर रायरेश्वर पठाराजवळ दोन वस्तीमध्ये धानवली आहे. येथील डोंगर दिसूळ व लाल मातीचा आहे. वरची व खालची धानवली मिळून १२१ कुटुंबे आहेत. त्यामध्ये प्रौढ ३९८ तर लहान ६० अशी एकूण ४५८ लोकसंख्या आहे. पुर्वसनासाठी आठ हेक्टर ७६ गुंठे जमीन हवी आहे. त्यासाठी चौतीस कोटी ७० लाख ३९ हजार रूपये लागणार आहेत.

मुळशीपासून ५६ किलोमीटर अंतरावर डोंगर पायथ्याशी घुटके वसलेले आहे. २०१९ च्या पावसा ळ्यात डोंगरावरील माती व मुरूम वाहून गेला.घरांना तडे पडले. ४६ कुटुंबातील २१९ नागरिक राहतात. पुर्वसनासाठी दोन हेक्टर ६० गुंठे जमीन अपेक्षित आहे. त्यासाठी आठ कोटी ८० लाख २० हजार रूपये हवे आहेत. त्यातील खाजगी भूसंपादनासाठी ८० लाख २० हजार ७४० रूपये द्यावे लागणार आहेत.

# श्री क्षेत्र देहू येथील यशस्वी अभ्यासिका म्हणजे हमखास यशाचा मार्ग

**पुणे/पिंपरी चिंचवड :** असाध्य ते साध्य करिता सायास । कारण अभ्यास तुका म्हणे ।। जगद्गुरु संत तुकोबारायांनी आपल्या अभंगामध्ये सांगितले आहे की कोणतीही असाध्य किंवा अवघड गोष्ट निरंतर अभ्यास केल्याने साध्य होत असते.

वारकरी संप्रदायचा दांडगा इतिहास असलेल्या देहूची लोकसंख्या साठ हजारांच्या आसपास आहे. घरी अभ्यास करण्यास येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन अभ्यासासाठी एक शांत, स्वच्छ आणि पोषक अशी जागा असावी हि गरज लक्षात घेऊन एक् वर्षांपूर्वी यशस्वी अभ्यासिकेची सुरुवात झाली. ग्रामीण भागातील जे युवक, युवती स्पर्धा परीक्षा देतात त्यांच्यासाठी चालवली जाणारी ही अभ्यासिका हे एक आदर्श सेवाकार्य आहे.

तीर्थ क्षेत्र देहू येथे मार्च २०२३ मध्ये ही अभ्यासिका सुरू केली. अभ्यासिका सुरू झाली तेव्हा वर्षभर ही अभ्यासिका एका छोट्याशा खोलीत सुरू करण्यात आली होती. मात्र सुरुवातीचा कालखंड खूप कठीण आणि खडतर ठरला. सुरवातीला प्रतिसाद ही फारसा नव्हता स्पर्धा परीक्षा तयारी करणारे दोन विद्यार्थी आणि दोन विद्यार्थिनी असे चार विद्यार्थी अभ्यासिकेत नियमित येत असत. त्यानंतर अभ्यासिकेत येणाऱ्या



विद्यार्थ्यांची संख्या हळू हळू वाढत गेली.

णझडउ, चझडउ, छऊ-, ठ्ठइ, खइझड, छएएढ, गएए, छएढ, उ-, चएऊखउ-ङ, गणऊखउख-ठ्ध, झडख/-डज/ डढख, कडउ, डडउ, पोलिस भरती तसेच अन्य स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही अभ्यासिका चालवली जाते या अभ्यासिकेला आता चांगले रूप प्राप्त झाले आहे.

अभ्यासिकेमध्ये देहू आणि आसपासच्या सांगुर्डी, येलवाडी, तळवडे, माळवाडी, सुदुंबरे, इंदोरी, खालुंब्रे आदी आठ-दहा गावांमधील, पाड्यांमधील एकूण चाळीस विद्यार्थी, विद्यार्थिनी नियमितपणे येतात. विद्यार्थी पहाटे ५ ते रात्री १२. ०० या वेळेमध्ये अभ्यासिकेत अभ्यास करतात. चखऊ मध्ये नोकरी करून सरकारी नोकरीचे स्वप्न युवक युवती पाहतात कामाच्या ठिकाणी मोकळ्या वेळेत अभ्यास करतात अश्या विध्यार्थ्यांसाठी देहूमध्ये अभ्यासिका उपलब्ध झाल्याने अभ्यासिका खूप लाभदायक ठरली आहे. अश्या विध्यार्थ्यांसाठी रात्री जास्त वेळ अभ्यासिका चालू असते. अभ्यासिकेतील सर्व विद्यार्थ्यांना संचालक प्रकाश कांबळे सर संचालिका सौ. मंगल कांबळे मॅडम तसेच अधिकारी झालेले माजी विद्यार्थी वेळोवेळी मार्गदर्शन करतात.

अभ्यासिकेत इंटरनेट, पिण्यासाठी स्वच्छ पाणी, मुला मुलींसाठी स्वतंत्र बैठक व्यवस्था, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह, लाईट इन्व्हर्टर, उउढत यंत्रणा, लॉकर या सारख्या सुवीधा पुरवल्या आहेत. अभ्यासिकेतील शांत व स्वच्छ वातावरणात अभ्यास करून ग्रामीण भागातील युवक, युवती स्पर्धा परीक्षांमध्ये चांगले यश मिळवत आहेत.

प्रसिद्धा रूपनवार (मंत्रालयीन क्लार्क व पुणे विभाग तलाठी) , राधा शिंदे (विक्री कर निरीक्षक),कृष्णा वायकर (उ- परीक्षा उत्तीर्ण ), माजी सैनिक संदीप खैरे (वनरक्षक ठाणे विभाग), माजी सैनिक भगवान सपाट (महसूल सहाय्यक) मागील वर्षी अभ्यासिकेतील या विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. तसेच मागील महिन्यात झालेल्या छएएढ

# पथारी विक्रेत्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करण्याची मागणी

**पुणे :** प्रधानमंत्री पथविक्रेता आत्मनिर्भर निधी योजना अंतर्गत 'स्वनिधी से समृध्दी' (विस्तारीत टप्पा ५) कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी पुणे महापालिकेने पथारी विक्रेत्यांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण करावे तसेच हे सर्वेक्षण पूर्ण होत नाही तोपर्यंत अतिक्रमणविरोधी कारवाई थांबवावी,अशी मागणी जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाचे वतीने पुणे महापालिका आयुक्तांकडे केली आहे.या मागणीचे पत्र आज(२१ जून २०२४) रोजी आयुक्त कार्यालयात देण्यात आले.अध्यक्ष संजय आल्हाट,सरचिटणीस रणजीत सोनवळे,रोहित जसवंते,उपाध्यक्ष बंडू वाघमारे यांनी पत्रकाद्वारे या संबंधी माहिती दिली.

पथ विक्रेता राष्ट्रीय धोरण अस्तित्वात आल्यावर पुणे पालिकेने दहा वर्ष अंमलबजावणी केलेली नाही.गेली दहा वर्ष पथविक्रेता योजनेच्या कुटुंबियांचे सर्वेक्षण प्रलंबित आहे. केंद्र सरकारच्या योजनांचा पथ विक्रेत्यांना लाभ मिळवून देणेकामी व जोपर्यंत पथारी विक्रेत्यांचे बायोमॅट्रिक सर्वेक्षण २०२४ पर्यंत होत नाही तोपर्यंत पथारी विक्रेत्यावरील कारवाई थांबवावी, असे पत्र यासंदर्भात जनशक्ती पथारी विक्रेता कल्याणकारी संघाने २६ फेब्रुवारी २०२४ रोजीदिले होते.त्यावर आयुक्तांकडून कोणतेही उत्तर मिळालेले नाही ,दुसरीकडे पथारी विक्रेत्यांवर अन्यायकारक कारवाई केली जात आहे. पथारी विक्रेत्यांना एकत्रितपणे या योजनेची माहिती देऊन मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. परंतू पालिका कर्मचारी करवाईच्या नावाखाली त्यांचा माल उचलून घेवून अवास्तव दंडाच्या रक्कमेची मागणी करतात.पैसे न दिल्यास माल घेवून निघून जात आहेत. हे प्रकार तात्काळ थांबवावे अन्यथा आयुक्त कार्यालयासमोर जनआदोलन करण्यात येईल,असा इशारा या पत्रकाद्वारे देण्यात आला आहे.

# नववधु-वरांनी वृक्षारोपण करूनच केला गृहप्रवेश



**तासगांव :** निंबळक ता. तासगाव येथील वधुवर चि. अमृत आणि सौ.रुपाली यांनी आपल्या लग्न सोहळ्यातून घरी न जाता आपल्या शेतात वृक्षारोपण करून गृहप्रवेश केला.

निंबळक येथील माजी सरपंच अधिकराव साळूंखे यांचा मुलगा अमृत यांचा विवाह वज्रचोंडे येथील पांडुरंग शिंदे यांच्या कन्या रुपाली यांचा विवाह सोहळा पार पडल्यानंतर वधू वरांनी घरी न जाता शेतात वृषारोपण करून घरी जाण्याचा निर्णय घेतला. पुणे येथे नोकरी करणाऱ्या अमृतच्या निर्णयाचे दोन्ही घरच्यांची स्वागत करत मान्यता देऊन प्रत्येक वर्षी वाढतें तापमांन आणि होणारा त्रास लक्षात घेता वृक्षारोपण अनेक पर्यावरणीय समस्या जसे की जंगलतोड, मातीची धूप, अर्ध-शुष्क भागात वाळवंटीकरण, ग्लोबल वार्मिंग आणि म्हणूनच पर्यावरणाचे सौंदर्य आणि संतुलन वाढवते. झाडे हानिकारक वायू शोषून घेतात आणि ऑक्सिजन उत्सर्जित करतात परिणामी ऑक्सिजनचा पुरवठा वाढतो.प्रत्येकाने वृक्षारोपण करणे आवश्यक आहे.

निंबळक येथील वधुवरांनी पर्यावरणाचे रक्षण करणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य पार पाडले आहे. झाडे हवेतील कार्बनडायऑक्साइड शोषून शुद्ध ऑक्सिजन निर्माण करतात.

# धाडसी निर्णय घेणारे नेते अजितदादा पवार



महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये सध्या महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पक्षप्रमुख अजित दादा पवार यांच्या आज दिनांक २२ जुलै रोजी वाढदिवस आहे. या वाढदिवसानिमित्त त्यांच्या वाढत्या लोकप्रियतेने बारामती लोकसभा मतदारसंघात झालेल्या सौ सुनेत्रा अजित पवार यांच्या पराभवाचा कोणताही लवलेश जाणवत नाही. कारण जय पराजय पलीकडे गेले त्यांना शहंशाह म्हणजेच अजित दादा पवार म्हणतात.

फजिक्स पक्षासारखे राखेतून उंच भरारी घेणारे त्यांचे व्यक्तिमत्व आज चांगलेच फुलून आलेले आहे. खरं म्हणजे राजकारणामध्ये घराणेशाही व दुसऱ्या बाजूला भाऊबंदकी याचा मिलाप म्हणजेच अजितदादा पवार असे म्हणणे वावगे ठरणार नाही. दोन्ही बाजूचा अनुभव घेऊन ते आज राजकीय पटलावर काम करत आहेत. एक घाव दोन तुकडे असा त्यांचा स्वभाव असल्यामुळे राजकारणातील छक्के पंजे करण्यापेक्षा जे काम होणार आहे. स्पष्टपणे समोरच्या व्यक्तीला संधी देण्याचा प्रयत्न त्यांनी अनेकांच्या बाबतीत केलेला आहे.

१९९१ पासून बारामती विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करीतआहेत.राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांचे ते पुतणे आहेत. ते सर्वाधिक वेळा राज्याचे उपमुख्यमंत्री राहिले असून, सध्या ते पाचव्यांदा या पदावर काम करत आहेत. राजकीय प्रदीर्घ अनुभव असल्यामुळे त्यांच्या शत्रुत्व मध्येही वाढ झाली असली तरी मित्रमंडळी सुद्धा त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या निर्माण झालेले आहेत.

२०१९ मध्ये, त्यांनी भारतीय जनता पक्षाचे नेते देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत उपमुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली. त्यांनी दावा केला की त्यांना राष्ट्रवादीच्या बहुसंख्य आमदारांचा पाठिंबा आहे. परंतु ३ दिवसात दोघांनी राजीनामा दिला. २०२३ मध्ये त्यांनी त्यांचे काका शरद पवार यांना सोडून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मंत्रिमंडळात उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली, यामुळे राष्ट्रवादीमध्ये अभूतपूर्व फूट पडली. तसेच अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावर देखील हक्क सांगितला. पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह स्वतःकडे ठेवण्याची इच्छा व्यक्त केली आणि विद्यमान अध्यक्ष शरद पवार यांच्यापासून राष्ट्रवादी पक्ष स्वतःकडे घेण्याचे संकेत दिले.

अजितदादा पवार यांनी १९८२ साली राजकारणात प्रवेश केला. त्याचवर्षी सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळावर त्यांची निवड झाली.पुणे जिल्हा सहकारी बँकेच्या अध्यक्षपदी १९९१ साली त्यांची निवड झाली. १६ वर्ष ते त्या पदावर होते.बारामती लोकसभा निवडणुकीमध्ये त्यांनी कार्यकर्त्यांचा बळी देऊन पळ काढण्यापेक्षा स्वतः च्या पत्नीला राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची उमेदवारी देऊन घड्याळ चिन्हावर निवडणूक लढवली आणि पराभव झाल्यानंतरही कुणालाही दोष न देता त्यांनी स्वतःवरच दोष देऊन पुन्हा एकदा राजकारणाच्या रणांगणामध्ये स्वतःला सिद्ध करण्यासाठी सज्ज झालेले आहेत. राजकारणामध्ये विजयाला सर्व वाटेकरी असतात पण व्यक्तिगतरित्या पराभव स्वीकारणे. याला सुद्धा मनाचा मोठेपणा असावा लागतो. ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार साहेब यांच्यापासून राजकीय दुरावा घेतल्यानंतर अजित पवारांनी पक्षावर ताबा मिळवला. त्यांना घड्याळ हे चिन्ह सुद्धा मिळाले पण त्यामुळे त्यांनी कुठेही विचलित न होता आपली कार्यपद्धत पुढे घेऊन जाण्याचा प्रयत्न केला.

आज भाजपला महाराष्ट्रात मिळालेला प्रतिसाद कमी झालेला आहे. हे खापर आता अजित पवार सोबत घेतल्यामुळे पराभव झाला असल्याचा शोध लावला जात आहे. यामध्ये खोलात गेले तर भाजपच्या विरोधात वातावरण तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी व त्यांच्या सहकाऱ्यांची कार्यपद्धतीवर नाराज झाल्यामुळे महाराष्ट्रातील मराठा, दलित, अल्पसंख्यांक हे महायुती पासून दूर झाले आहेत. पण, या सर्व गोष्टींचा आत्मचिंतन करून मित्रपक्षाने एकमेकांना आधार देण्यापेक्षा उपमुख्यमंत्री अजित पवार यांना टार्गेट केले जात आहे .त्यामुळे अजित पवार वगळता त्यांचे समर्थक नाराज झालेले आहेत. भाजपच्या सोबत जाऊन खरं म्हणजे अजित दादा पवार यांचे राजकीय नुकसान झालेले आहे. हे कधीही भरून निघणार नाही. परंतु काही घेतलेले धाडसी निर्णय हे योग्य असल्याचे दाखवून देण्याची क्षमता अजितदादा पवारांकडे निश्चितच आहे. भविष्यात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांची वाटचाल कायमच राहणार आहे. त्यांना वाढदिवसानिमित्त हार्दिक शुभेच्छा आहेत. आगामी विधानसभेच्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्र कोकण मुंबई विदर्भ मराठवाडा व उर्वरित महाराष्ट्र अशा प्रत्येक ठिकाणी अजित दादा पवार यांचे समर्थक निवडणुकीला सामोरे जाऊन यश मिळवतील अशी आशा व्यक्त करून त्यांना पुन्हा एकदा शुभेच्छा देतो.

**- पत्रकार अजित जगताप, सातारा.**

**मोबाईल नंबर ९९२२२४१२**

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# महायुतीत शिंदेंची 'पॉवर' वाढली, तर महाविकास आघाडीत शरद पवारांचंही शतकी टार्गेट

**मुंबई :** लोकसभा निवडणुका पार पडल्यानंतर आता सगळ्यांचेच लक्ष लागले ते राज्याच्या विधानसभा निवडणुकांकडे. महायुती असो की महाविकास आघाडी (चरहरींळ्ज्ञरी रसहरवळ) असो जागा वाटपावरून सध्या या दोन्ही आघाड्यामध्ये वेगवेगळ्या चर्चा सुरू आहेत. विधानसभा निवडणुकीच्या दृष्टिकोनातून महायुती आणि महाविकास आघाडी यांच्यात कुठे रस्सीखेच तर कुठे सामंजस्य भूमिका घेत असल्याचे पाहायला मिळत आहे. लोकसभा निवडणुकांच्या निकानंतर महायुतीमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची (एज्ञपरींह डहळपवश) बार्गेनिंग पॉवर वाढली असून महाविकास आघाडीमध्ये पुन्हा एकदा शरद पवारांच्या अनुभवांची खेळी होणार असल्याचे दिसून येते. त्यामुळे, विधानसभा निवडणुकीतील जागावाटपक नेमकं कसं होतं, याकडे महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

शिवसेनेच्या ५८ व्या वर्धापन दिनी रामदास कदम यांनी जाहीर भाषणातून १०० जागांची मागणी केली. महायुतीत जागा वाटपाबाबत अजून चर्चा देखील सुरू झालेली नसताना रामदास कदम यांचं हे विधान चांगले चर्चेत आले. दोन वर्षांपूर्वी ठाकरेंच्या सरकारला धक्का देत राज्यात शिंदे यांची शिवसेना आणि भाजप एकत्र आले सरकार मध्ये बसले. त्यानंतर, त्यांच्या जोडीला राष्ट्रवादी काँग्रेसनेही सत्तेत सहभागी होऊन समर्थन दिलं. मात्र ,आता विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर शिंदे यांच्या शिवसेनेतून १०० जागांची मागणी करण्यात आली आहे. आम्ही जागावाटपात विधानसभेच्या १०० जागा मागितल्या आहेत. त्यातल्या आम्ही ९० जागा जिंकू, ही आमची विनंतीवजा मागणी असल्याचे रामदास कदम यांनी म्हटलं आहे. कारण, लोकसभा निवडणुकीत शिंदेच्या शिवसेनेची

## विधानसभेला किती जागा?

बार्गेनिंग पॉवर चांगलीच वाढली आहे.

महायुतीत शिंदेंचे नेते भाजपची डोकेदुखी

लोकसभा निवडणुकीत शिंदेंच्या शिवसेनेला ७ जागांवर यश मिळालं. तर भाजपने ९ जागा जिंकल्या आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादीला फक्त एकच जागा जिंकता आली. महायुतीचे हे आकडे बघता सध्याच्या घडीला महायुतीत शिंदेंच्या शिवसेनेचे बार्गेनिंग पॉवर वाढल्याचे पाहायला मिळते. त्याचमुळे आता लोकसभा निवडणुकीचा दाखला देत शिंदेंच्या शिवसेनेचे नेते भाजपची डोकेदुखी ठरू लागले आहेत. एकीकडे शिंदेंच्या शिवसेनेचे नेते जाहीरपणे जागा वाटपावर बोलत असताना भाजपकडून मात्र सावध पवित्रा घेतला गेलाय. भाजप आमदार नितेश राणे यांनी रामदास कदम हे ज्येष्ठ नेते असल्याचे म्हणत महायुतीच्या नेत्यांनी जाहीरपणे असे बोलू नये. आमचे नेते एकत्र बसून याचा निर्णय करतील असे म्हटले. तर, प्रवीण दरेकर यांनी देखील हा वरिष्ठांचा निर्णय असल्याचे सांगत बोलण टाळले.

एकीकडे महायुतीमध्ये जागा वाटपावरून आतापासूनच रस्सीखेच सुरू असताना महाविकास आघाडी मात्र सावध भूमिका घेताना पाहायला मिळत आहे. विधानसभेच्या जागा वाटप संदर्भात महाविकास आघाडीमध्ये अद्याप कुठलीही प्राथमिक सुद्धा चर्चा झालेली नाही. त्यामुळे कोणी किती जागा लढवायच्या हे अद्याप ठरलेलं नाही. जिथे ज्याचा चांगला आणि ताकदीचा उमेदवार ती त्या पक्षाची जागा अशाप्रकारे जागावाटप केलं जाईल. त्यामध्ये अंतिम निर्णय महाविकास आघाडीची समन्वय समिती आणि प्रमुख नेते घेतील, असे शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्यांकडून सांगण्यात आले.तर, पुण्यात आपल्याला लोकसभेला जास्त जागा मिळायला हव्या होत्या. मात्र, महाविकास आघाडीची एकी राहावी यासाठी मी दोन पाऊल मागे आलो, असे विधान शरद पवारांनी पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केले आहे. एकत्रित राहिलो म्हणून यश मिळाल असे देखील शरद पवार यावेळी म्हणाले. म्हणजेच आपला प्रदीर्घ अनुभव पणाला लावून पवारांनी लोकसभा निवडणुकांत राजकीय खेळी केली, तीच पुनरावृत्ती आता विधानसभेतही दिसून येईल.

### राष्ट्रवादीचा १०० जागा लढवण्याचा विचार, काँग्रेस शांत

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षामध्ये एक आठवडा विधानसभा निहाय बैठका आयोजित करण्यात आल्या असून प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी विधानसभानिहाय विविध सेलकडून विधानसभा मतदारसंघांचा आढावा घेतला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने शंभर जागा लढण्यासंदर्भामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस विचार करत आहे. सूत्रांच्या माहितीनुसार राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष १०० विधानसभा लढवण्याच्या तयारीत आहे. दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये लोकसभा निवडणुकीत मोठा भाऊ ठरलेल्या काँग्रेसने सद्या तरी जागा वाटपाबाबत काही ठरले नसल्याचे सांगत आमचा उद्देश भाजपमुक्त महाराष्ट्र असल्याचे सांगितले आहे. त्यामुळे, जागावाटपात काँग्रेस सामंजस्य भूमिका घेऊन महाविकास आघाडीतूनच विधानसभा निवडणूक लढवण्यासाठी प्रयत्न करेल, असेच दिसून येते.**

### जागावाटपांवरुन डोकेदुखी वाढणार

**एकूणच काय, महायुती असो वा महाविकास आघाडी विधानसभेच्या जागा वाटपावरून सर्वच पक्षांची चांगलीच डोकेदुखी वाढणार आहे. जागा वाटपासोबतच महायुती आणि महाविकास आघाडीला युती टिकवून ठेवावी लागणार आहे. त्यामुळे येत्या काळात महायुती आणि महाविकास आघाडी कशाप्रकारे कोणताही वादविवाद न होऊ देता जागावाटप करेल आणि निवडणुकीला सामोरे जाणार हे पाहण महत्वाचे ठरेल. मात्र, पुढचे काही महिने तरी महाविकास आघाडी आणि महायुतीमध्ये जागा वाटपावरुन जोरदार चर्चा आणि रस्सीखेच रंगणार हे मात्र नक्की.**

# ओबीसी समाज आक्रमक

## नांदेडात तहसील कार्यालयासमोर थेट सरणावर बसून आमरण उपोषणास सुरूवात!

नांदेड : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण व इतर मागण्या मान्य करू नये या मागणीसाठी प्राध्यापक लक्ष्मण हाके यांचे आमरण उपोषण सुरु आहे. या उपोषणाला आता मराठवाड्यातून पाठिंबा मिळत आहे. नांदेड जिल्ह्यात देखील ओबीसी समाज आक्रमक झाला आहे.

सरणावर बसून आमरण उपोषण सुरूवात

भोकर तालुक्यात ओबीसी आरक्षण बजाव समितीच्या वतीने तहसील कार्यालय परिसरात संजय दिगंबर गौड आलेवार यांनी चितेवर (सरण) बसून आमरण उपोषणास सुरूवात केली आहे. या आंदोलणास सकल ओबीसी बांधवांनी पाठिंबा दर्शवला. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत हे उपोषण सुरू राहाणार असल्याचे ओबीसी बांधवाकडून सांगण्यात आले.

नांदगावमध्ये ओबीसींनी काढला मोर्चा

दरम्यान, ओबीसी समर्थनार्थ वडीगोद्रीत प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथ वाघमारे यांनी गेल्या आठ दिवसांपासून आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाला पाठिंबा दर्शविण्यासाठी नाशिकच्या नांदगावात आज ओबीसी बांधवांनी एकत्र येत मोर्चा काढला..

शहरातील हुतात्मा स्मारक येथून निघालेला हा मोर्चा थेट तहसील कार्यालयाच्या प्रांगणात नेण्यात आला.

ओबीसींच्या आरक्षणात घुसखोरी करू नये, शासनाने प्रा.लक्ष्मण हाके यांच्या उपोषणाची दखल घेवून मागण्या त्वरित मान्य कराव्या,

मनोज जरांगे यांच्या सगेसोयरे व सरसकट आरक्षणाची मागणी सरकारने अमान्य करावी. अशी मागणी यावेळी ओबीसी बांधवांनी केली. ओबीसी बांधवांच्या विविध मागण्यांचे निवेदन यावेळी तहसीलदार यांना देण्यात आले. दरम्यान, आंदोलकांनी ओबीसी समर्थनार्थ जोरदार घोषणाबाजी केली.



## स्वामींच्या वटवृक्ष पूजेसाठी अक्कलकोटच्या स्वामी समर्थ मंदिरात महिलांची गर्दी

**सोलापूर :** अक्कलकोट शहरातील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानात वटपौर्णिमा सण मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने पार पडला. सकाळी ८ वाजल्यापासूनच असंख्य सुवासिनी महिलांनी अपार श्रद्धेने वटवृक्ष मंदिरातील वटवृक्षाची वडपूजा करून हा सण साजरा केला. वटवृक्षाची पूजा करण्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून हजारो महिला दाखल झाल्या आहेत.

दरम्यान, श्री.वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानातील साक्षात श्री स्वामी समर्थांचा सहवास लाभलेल्या वटवृक्षास धार्मिक व ऐतिहासिक महत्व असल्याने येथे दरवर्षी वटपौर्णिमेच्या दिवशी वडपुजेसाठी असंख्य महिला भक्त गर्दी करून वटसावित्रीने सुरु केलेली ही वडपूजा परंपरेप्रमाणे दरवर्षी स्वामींच्या दरबारी साजरी करतात. वडपूजा करण्यासाठी स्थानिक महिलांबरोबरच परगावाहून आलेल्या महिलांची संख्या लक्षणीय आहे. वटपौर्णिमा असल्याने श्रींच्या दर्शनाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. पहाटे ५ वाजल्यापासूनच भाविकांनी स्वामींच्या दर्शनाकरिता गर्दी केली होती. भाविकांच्या दर्शनाकरिता मंदिर समितीच्या वतीने विशेष सोय करण्यात आली होती.

## शिवराज्याभिषेक दिन साताऱ्यात उत्साहात साजरा

**सातारा :** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवरायांचा साडेतीनशे वा तिथीप्रमाणे साजरा होणारा शिवराज्याभिषेक दिन साताऱ्यात विविध उपक्रमाने साजरा करण्यात आला गुरुवारी छत्रपती शिवरायांना अभिवादन करून जल्लोषात मिरवणूक काढण्यात आली या मिरवणुकीचे आयोजन शिवराज्याभिषेक दिन उत्सव समिती सातारा यांचे वतीने करण्यात आले होते. रिमझिम त्या पावसातही सातारकरांचा मिरवणुकीच्या निमित्ताने उत्साह पाहायला मिळाला.



शिवराज्याभिषेक दिन उत्सव समितीच्या वतीने दरवर्षी तिथीप्रमाणे शिवराज्याभिषेक दिन हा उत्साहात साजरा केला जातो. यंदा शिवराज्याभिषेकाचे साडेतीनशेवे वर्ष होते त्यामुळे विविध कार्यक्रमांचे आयोजन तीन दिवस साताऱ्यात करण्यात आले होते. पहिल्या दिवशी येथील प्रतापसिंह हायस्कूल मधून विद्यार्थ्यांना सुमारे पाचशे वह्यांचे वाटप करण्यात आले.

त्यानंतर ज्येष्ठ इतिहास संशोधक विनोद बाबर यांनी शिवनीती आणि शिवकाल यांच्यावर व्याख्यान दिले तर तिसऱ्या दिवशी शिवराज्याभिषेक दिनाच्या निमित्ताने छत्रपती शिवरायांना सकाळी जलाभिषेक करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

यावेळी शिवराज्याभिषेक दिनाचे सक्रिय कार्यकर्ते पत्रकार संघाचे शहराध्यक्ष विनोद कुलकर्णी, जिल्हा पत्रकार संघाचे अध्यक्ष हरीश पाटणे, उद्योजक संग्राम बर्गे, माजी उपनार अध्यक्ष मनोज शेंडे, महादेव उपनगराध्यक्ष अमोल मोहिते, अमर बेंद्रे तसेच बहुसंख्य शिवप्रेमी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते. पोलीस अधीक्षक समीर शेख यांच्या हस्ते सुद्धा छत्रपती शिवरायांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



## रक्षा खडसेंसोबत घेतली अमित शाहांची भेट!

**नवी दिल्ली :** ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांनी गुरुवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. यावेळी भाजपच्या नवनिर्वाचित खासदार आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे देखील उपस्थित होत्या. दरम्यान, एकनाथ खडसे अजूनही भाजप प्रवेशाच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे पुन्हा एकदा एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांनी जोर धरला आहे.

गुरुवारी रात्री एकनाथ खडसे आणि केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेतली. ही सदिच्छा भेट असल्याचे सांगण्यात येत आहे. गेल्या काही महिन्यांपासून एकनाथ खडसे भाजपमधे प्रवेश करणार असल्याच्या चर्चा सुरू आहेत. त्याच पार्श्वभूमीवर एकनाथ खडसे आणि अमित शाह यांची भेट महत्त्वाची मानली जात आहे. भाजपमध्ये एकनाथ खडसे यांना मोठी जबाबदारी देण्यात येणार असल्याची चर्चा देखील सुरु आहे.

दरम्यान, भाजपवर नाराज झालेल्या एकनाथ खडसे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला होता. मात्र, आता एकनाथ खडसे पुन्हा स्वगृही परतणार आहेत. याबाबत काही दिवसांपूर्वी एकनाथ खडसे यांनी स्वतः कबुली दिली होती. पण अद्याप त्यांचा पक्षप्रवेश झालेला नाही. फक्त प्रवेशाच्या चर्चा सुरु आहेत. आता त्यांचा पक्ष प्रवेशाचा मुहूर्त कधी लागतो, याकडे त्यांच्या समर्थकांचे, हितचिंतकांचे लक्ष लागले आहे.

गेल्या काही दिवसांपूर्वी केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी एकनाथ खडसे यांच्या भाजप प्रवेशाबद्दल भाष्य केले होते. नाथाभाऊ मोठे नेते आहेत. त्यांच्या प्रवेशासंदर्भात आमचे केंद्राचे आणि राज्याचे वरिष्ठ नेते लवकरच निर्णय घेतील. तसेच, योग्यवेळी नाथाभाऊंचा भाजपमध्ये प्रवेश होईल, असा विश्वास केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना व्यक्त केला होता.

## 'नीट'चे समुपदेशन होणारच, रविवारी 'त्यांची' फेरपरीक्षा

**नवी दिल्ली :** सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी वादग्रस्त राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा - पदवी (नीट-यूजी) २०२४ची प्रस्तावित समुपदेशन प्रक्रिया ६ जुलैपासून पुढे ढकलण्यास नकार दिला. ही प्रक्रिया निव्वळ सुरू करणे आणि बंद करण्याची नाही, असेही न्यायालयाने खडसावले.

दरम्यान, ग्रेस गुण मिळालेल्या १,५६३ उमेदवारांसाठी येत्या रविवारी सात केंद्रांवर फेरपरीक्षा घेतली जाईल, अशी माहिती राष्ट्रीय चाचणी संस्थेच्या (एनटीए) अधिकाऱ्यांनी दिली आहे.

# काँग्रेसतर्फे शासनाच्या विरोधात 'चिखलफेको' आंदोलन

**हिंगोली :-** महाराष्ट्रासह देशातील शेतमजूर, शेतकरी, व्यापारी, बेरोजगार आदींच्या अनेक समस्या व प्रश्न निर्माण झाल्याने हिंगोलीत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (उेपसीशी) कमेटी जिल्हा उपाध्यक्षांच्यावतीने २१ जून रोजी शासनाच्या विरोधात चिखलफेको आंदोलन करण्यात आले.

याप्रकरणी जिल्हाधिकारी कार्यालयात २१ जूनला दिलेल्या निवेदनात नमूद केले की, महाराष्ट्रात(चरहरीरीहींर) व देशात एकाच पक्षाचे सरकार असून या काळात शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, बेरोजगारांच्या अनेक समस्या व प्रश्न निर्माण झाले असल्याने सर्वत्र अस्थिरता निर्माण झाली आहे. शेतकर्यांच्या शेतीमालाल हमीभाव मिळत नाही, लाखो शेतकर्यांना पीकविमा अद्यापही मिळाला नाही, शेतकर्यांना आवश्यक असणारे खत, बी-बियाणे, किटकनाशके आदींचे भाव गगणाला भिडले आहेत. त्यामुळे शेतकरी (ऋीशी)हैराण झाले आहेत. शेतकर्यांना बोगस बियाणे मिळत असल्याने लाखो शेतकर्यांचे श्रम, वेळ वाया जाऊन आर्थिक नुकसान होत आहे. शेतकरी आत्महत्याही (डीळलळवशी) वाढल्या आहेत, शेतमजुरांना हाताला काम उपलब्ध होत नाही, परिणामी रोजगारीचे प्रमाण वाढले आहे. कुशल व अकुशल तसेच प्रशिक्षित युवकांच्या हाताला काम नसल्याने त्यांच्यातील उदासिनता वाढली असल्याने अनेकजण आत्महत्येचा मार्ग स्विकारत आहेत. अशा बाबतीत शासन उदासीन आहे.

व्यापारी शासनाला जीएसटी, इनकमटॅक्स भरतात त्यामुळे महसूल व उत्पन्न प्राप्त होते

व्यापारी शासनाला जीएसटी(ऋडढ), इनकमटॅक्स भरतात त्यामुळे महसूल व उत्पन्न प्राप्त होते; परंतु त्यांना कोणत्याही सुविधा उपलब्ध नाही. या कारणामुळे शासनाचा निषेध नोंदविण्यात आला. निवेदनावर जिल्हा काँग्रेस कमेटीचे(लेपसीशी लोळींशश) उपाध्यक्ष सुरेश अप्पा सराफ, मा.शहराध्यक्ष बापूराव बांगर, कृउबास संचालक शामराव जगताप, मा.सेनगाव तालुकाध्यक्ष विनायकराव देशमुख, मा.जि.प.सदस्य प्रकाशराव थोरात, प्रकाशराव वाघ, सरपंच माणिकराव देशमुख, माजी नगराध्यक्ष सुधीर अप्पा सराफ, माजी नगरसेवक अनिल नैनवाणी, अ.माबुद बागवान, जावेद कुरेशी, आरीफ लाला, मिलींद उबाळे, बाशिद मौलाना, महाराष्ट्र काँग्रेस कमेटीचे विशाल घुगे, बंटी नागरे, शुभम सराफ, विक्की सराफ, पिनू कांबळे, चांदू प्यारेवाले, जुबेर मामू, शासन कांबळे, महेश थोरात, दत्तराव लोंढे, शिवम तडकसे, रामदास थोरात, अंकुश बांगर,अजय सूर्यवंशी, शेख पैजल, इरफान पठाण, शेषराव माणिकराव, यादवराव साहेबराव, अशोक डोल्हारे आदींच्या स्वाक्षर्या आहेत.

निवेदन देताना उबाठाचे पदाधिकारीही उपस्थित

याप्रकरणी नायब तहसीलदार सचिन जोशी यांना निवेदन देण्यात आले. यावेळी काँग्रेस पदाधिकार्यां समवेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे माजी आमदार डॉ.संतोष टारफे, जिल्हाप्रमुख अजय उर्फ गोपू पाटील, शिवसेना जिल्हा संघटक बाळासाहेब मगर, आनंदराव जगताप यांचीही उपस्थिती होती.

## संशयावरून पत्नीचा खून

**पुणे /पिंपरी चिंचवड :** देहूगाव येथील गाथा मंदिरा लगत असलेल्या आनंद डोहाच्या घाटावर एक महिलेचा मृतदेह असल्याची माहिती देहूरोड पोलिसांना मिळाली असता देहूरोड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय वाघमारे, आशिष जाधव सहायक पोलिस निरीक्षक देहूरोड हे घटना स्थळी दाखल झाले त्यांनी सदर ठिकाणी मयत महिलेच्या मृदेहाचा पंचनामा करून मृदेह उत्तरीय तपासणी साठी वायसीएम रुग्णालय पिंपरी येथे पाठविला.आणि तपासाची चक्रे वेगाने फिरवून आरोपीला सक तासाच्या आत ताब्यात घेतलं.

प्रतीक्षा जयदीप यादव वय-२१ ( रा.वैभव कांबळे यांच्या रुम ) ओमसाई सोसायटी जैन मंदिरा समोर ,देहूगाव असे खून करण्यात आलेल्या विविहित तरुणीचे नाव आहे.या प्रकरणी जयदीप अर्जुन यादव - वय २९ ( रा.वैभव कांबळे यांच्या रूम मध्य) ओमसाई सोसायटी जैन मंदिरा समोर ,देहूगाव पुणे ,असे पत्नीचा खून केलेल्या आरोपीचे नाव आहे.या प्रकरणी सरकार तर्फे पोलीस शिपाई किरण राजाभाऊ पाटील , यांनी देहूरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

देहूरोड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार गुरुवार ( ता.२०) रोजी संध्याकाळी साडे सात ते नऊ वाजण्याच्या सुमारास गाथा मंदिर माघील घाट परिसर येथील आनंद डोहामध्ये असलेल्या श्रीकृष्ण मंदिरा माघे घाटावर पत्नी प्रतीक्षा आणि जयदीप हे बोलत बसले होते.त्यावेळेस पत्नी प्रतीक्षा हिचा ओढणीच्या साह्याने गळा आवळून खून केला.पत्नी प्रतीक्षा व स्वतःचा मोबाईल इंद्रायणी नदीच्या पात्रात फेकून पुरावा नष्ट केला.देहूरोड पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता , तिच्या चारित्र्यावर संशय घेऊन प्रतीक्षा हिचा ओढणीने गळा आवळून खुन केला असल्याचे कबूल केले.पुढील तपास देहूरोड पोलीस करीत आहेत. तपासी अधिकारी प्रभाकर खणसे पोलीस उपनिरीक्षक हे असून , बाप्पू बांगर पोलीस उपायुक्त परिमंडळ-२ देविदास घेवारे ,सहायक पोलिस आयुक्त देहूरोड विभाग, सतीश कसबे सहायक पोलिस आयुक्त वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड आदींनी घटनास्थळी भेट देऊन घटनेची माहिती घेतली.

## भाजपा सातारा लोकसभा आढावा बैठक संपन्न पदाधिकाऱ्यांच्या भावना प्रदेशाध्यक्षांपर्यंत पोहोचवणार :- योगेशअण्णा टिळेकर

**सातारा :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी , प्रदेश पातळीवरील पदाधिकारी प्रभारी म्हणून नेमून त्यांना लोकसभेतील प्रत्येक विधानसभा क्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या प्रदेश, जिल्हा , मंडल पदाधिकारी ,आघाड्या मोर्चाचे प्रदेश , जिल्हा , मंडल पदाधिकारी यांच्याकडून लोकसभेत केलेल्या कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी देण्यात आलेली होती

सातारा लोकसभेसाठी माजी आमदार योगेशअण्णा टिळेकर यांची नियुक्ती करण्यात आली होती, भाजपा सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी माजी आमदार योगेशअण्णा टिळेकर यांचे स्वागत केले आणि बैठकीचे प्रास्तविक केले , विधानसभा क्षेत्रातील भारतीय जनता पार्टीचे काम आणि परिस्थिती याची माहिती दिली

सातारा लोकसभेतील प्रत्येक विधानसभेच्या बैठकीमध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी हे तिसऱ्या वेळी पंतप्रधान झाल्याबद्दल त्यांच्या अभिनंदनचा ठराव मांडण्यात आला , त्याचप्रमाणे माननीय खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या विजयाबद्दल त्यांच्या सुद्धा अभिनंदनचा ठराव मांडण्यात आला आणि दोन्ही ठराव सर्व पदाधिकाऱ्यांनी अनुमोदन देऊन मंजूर करण्यात आले



सातारा लोकसभेचे नवनिर्वाचीत खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांना केंद्रात चांगले मंत्रिपद मिळावे यासाठी ठराव मांडून तो मंजूर करण्यात आला

सातारा विधानसभेचे आमदार श्रीमंत छत्रपती शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी ज्याप्रमाणे झोकून देऊन काम केले, प्रवास केला आणि भारतीय जनता पार्टीचे खासदार साताऱ्यात निवडून यावेत यासाठी जे प्रयत्न केले त्याबद्दल त्यांचेही अभिनंदन करून त्यांना राज्य मंत्रिमंडळात महत्त्वाच्या मंत्रिपदाची जबाबदारी मिळण्याचा ठराव मांडण्यात आला आणि मंजूर करण्यात आला

खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले हे राज्यसभेवर खासदार होते ते आता लोकसभेवर निवडून गेले आहेत त्यांच्या रिकाम्या झालेल्या जागेवर सातारा लोकसभेतीलच भारतीय जनता पार्टीच्याच पदाधिकारी, कार्यकर्त्याला संधी मिळावी असा ठराव मांडून तो मंजूर करण्यात आला

सातारा लोकसभा प्रभारी , माजी आमदार योगेशअण्णा टिळेकर यांनी सातारा लोकसभेतील सहा विधानसभा क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या बैठका घेतल्या , सातारा लोकसभेत भारतीय जनता पार्टीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांनी चांगले काम केल्याबद्दल त्यांनी सर्वांचे अभिनंदन केले त्याचप्रमाणे ज्या पदाधिकाऱ्यांना वैयक्तिक चर्चा करायची होती त्यांच्यासाठी वेळ दिला आणि विधानसभा बैठक आणि वैयक्तिक मांडणी मधील विषयाचा अहवाल तयार करून तो माननीय प्रदेशाध्यक्ष आमदार चंद्रशेखर भाऊ बावनकुळे यांच्याकडे आणि प्रदेश कोअर कमिटीकडे सुपूर्त करणार असल्याचे सांगितले

# पश्चिम महाराष्ट्रातील OBC एकत्र झाला तर तुम्ही राजकारण विसरा

## लक्ष्मण हाकेंचा मनोज जरांगेंना थेट इशारा

**जालना:** मराठ्यांना आरक्षण मिळालं नाही तर मंडल आयोगाला चॅलेंज करणार असं मनोज जरांगे (चरपेक्ष गरीरपसश) म्हणाले, पण ते एवढं सोपं आहे का असा सवाल विचारत ओबीसी आंदोलक लक्ष्मण हाके (डरारप क्रज्ञश) यांनी मनोज जरांगे यांच्यावर जोरदार टीका केली. मराठवाड्यातील ओबीसी एकत्र येतोय, आता पश्चिम महाराष्ट्रातील ओबीसी एकत्र आला तर मनोज जरांगे यांनी राजकारण विसरावं असा इशारा लक्ष्मण हाके यांनी दिला. ओबीसी आरक्षणाच्या संरक्षणासाठी लक्ष्मण हाके हे वडीगोद्री या गावात उपोषणाला बसले आहेत. त्यावेळी त्यांनी मनोज जरांगे यांना इशारा दिला.

काय म्हणाले लक्ष्मण हाके?

मराठे आज एक नाहीत, संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा त्या पासून एकत्र आहेत. यशवंतराव चव्हाण यांनी हा महाराष्ट्र मराठी माणसाचा होणार असे सांगितले होते. हे कळण्याएवढी जरांगे यांची उंची नाही. जरांगे आणि त्यांचे सल्लागार कायम शरद पवार यांचा विरोध करत आलेत. जरांगे तुम्हाला आरक्षणातले शून्य नॉलेज आहे, तुंमची माझ्यासमोर बोलायची लायकी नाही. याला पहिला शिक्षण द्या.

जरांगे म्हणाले की ओबीसींनी मराठ्यांच्या वाट्याचं आरक्षण गेल्या ७० वर्षांपासून खाल्लं. पण ७० वर्षे खाण्याचा प्रश्न येतोच कुठे? मंडल आयोग १९९३ साली लागू झाला. ओबीसी ने रिझर्वेशन खाल्ल असतं तर ओबीसीचे ४०० कारखाने दिसले असते. आज राज्यात २५० साखर कारखाने आहेत. त्यापैकी ९० टक्के कारखाने हे मराठा समाजाचे आहेत.

भुजबळांची राजकीय कारकीर्द उद्धस्त करायला जनता तयार आहे ना, तू कोण राजकीय कारकीर्द उद्धस्त करणारा?

भुजबळ साहेब असतील, लक्ष्मण हाके असेल, प्रकाश शेंडगे असतील, महादेव जानकर असतील, गोपीचंद पडळकर असतील ,मुंडे बहीण बंधू असतील, वडेट्टीवार साहेब असतील ही माणसं या महाराष्ट्रातल्या जाती-उप जातीसह ४९२ जातींची भाषा बोलतात आणि जरांगे तुम्ही फक्त एका जातीची भाषा बोलताय. मग नक्की जातीयवादी कोण?

गेली सात आठ महिने आम्ही शांत बसलो. जरांगे तुम्ही बीड शहर जाळलं, टार्गेट करून ओबीसी नेते बदनाम केले. मराठा तरुणांना माझी कळकळीची विनंती आहे. या महाराष्ट्रात छत्रपती शिवरायांची पॉलिसी तुम्ही अभ्यासा. शिवाजी महाराजांनी अठरापगड जातीला बरोबर घेतलं म्हणून या महाराष्ट्राची माती, महाराष्ट्राची ओळख देशात वेगळी आहे. ओबीसींनी कधी कायदा हातात घेतलेला नाही. इथे अठरापगड जातीची माणसे येत आहेत. मंडल आयोग चॅलेंज करायला महाराष्ट्र सोडून दे.नॉर्थ आणि साऊथ सुद्धा आहे, एवढं सोपं आहे. तुम्हाला मुसलमानांची मते चालली मात्र तुम्हाला जलील चालले नाहीत. तुम्हाला दलितांची मते चालली मात्र तुम्हाला आनंदराज आंबेडकर, बाळासाहेब आंबेडकर चालले नाहीत. आपण सर्व दलित, मुस्लिम, एसटी, ओबीसी एकत्रित येऊयात. आपला कोण, परका कोण याचा नक्कीच विचार करूया.

तुम्ही कायम सत्तेत राहिला, तुम्ही निवडणुका जिंकण्याचं तंत्रज्ञान आत्मसात केलं, मात्र आमच्या ओबीसींची भावना आणि वेदना इथल्या सत्ताधाऱ्यांना कधीही समजली नाही. आम्ही आमची भूमिका मांडतो आम्ही कधी ते निर्माण करत नाही. आम्ही ओबीसींच्या मनामध्ये विश्वास निर्माण करत आहेत.

पश्चिम महाराष्ट्र मध्ये मराठवाड्याच्या बरोबरीने ओबीसी समाज आहे. मराठवाडा पश्चिम महाराष्ट्रातील ओबीसी जागा झाला तर तुम्ही राजकारण नावाची गोष्ट विसरून जा.



वडूज येथे खटाव तालुका राष्टीय काँग्रेसची बैठक झाली त्यावेळी बोलताना रणजितसिंह देशमुख

# गोरेंच्या विरोधात काँग्रेसने फुंकले रणशिंग

## वडूज येथे खटाव तालुका राष्टीय काँग्रेसची बैठक

**वडूज :** राज्यात काही महिन्यातच विधानसभा निवडणूकीचे बिगुल वाजणार असून खटाव तालुक्यातील कार्यकर्त्यांनी तळागाळात पोहचून यावेळी माण विधानसभा मतदार संघातील निष्क्रीय भाजप उमेदवार हरवावा असा वडूज येथील राष्ट्रीय काँग्रेसच्या बैठकीत निर्णय झाला.

येथील फिनिक्स ऑगनायझेशन सभागृहात खटाव तालुक्यातील राष्ट्रीय काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली यावेळी अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे सदस्य रणजितसिंह देशमुख, प्रदेश प्रतिनिधी राजूभाई मुलाणी, तालुका ध्यक्ष डॉ. संतोष गोडसे, उपसभापती विजयकुमार शिंदे, माण विधानसभा काँग्रेसचे प्रमुख डॉ. महेश गुरव, ओबीसे सेलचे तालुकाध्यक्ष सुनिल भिसे आदिंची प्रमुख उपस्थितीहोती

याप्रसंगी बोलताना रणजितसिंह देशमुख म्हणाले की खटाव तालुक्यात लोकसभे दरम्यान भाजपाने आर्थिक रणनितीचा वापर करून लोकशाहीतील निवडणूक प्रकिया वेगळ्या वळणावर नेहली मात्र तालुक्यातील काँग्रेस विचार सरणीचे मतदार व पदाधिकारी किंचीतही विचलीत झाले नाहित जातीयवादी पक्षाला राज्यात जनतेने लोकसभेदरम्यान स्पष्ट नाकारले असून येणाऱ्या विधान सभेत भाजपाला संपुष्टात आणण्याची धमक फक्त राष्ट्रीय काँग्रेस कार्यकर्ता मधेच आहे. त्यामुळे याक्षणा पासून भाजप विरोधी भूमिका कणखरपणे मांडण्याची जबाबदारी तुमची आमची आहे. माढा लोकसभेत प्रचंड मतांनी भाजपा उमेदवाराचा पराभव हीच विधान सभेची नांदी ठरेल असा आत्मविश्वास ही देशमुख यांनी व्यक्त केला

याप्रसंगी उपसभापती विजयकुमार शिंदे दुष्काळी खटाव तालुक्यात भाजपाच्या आमदारांनी कायम दुजाभाव करून सापत्न भावाची वागणूक दिली तसेच शेती पाणी व पिण्याच्या पाण्याबाबत सत्ते चा गैरवापर करत येथील जनतेला तहानलेलीच ठेवले हे पाप त्यांच्या माथी असून निसर्गानेच येथील जनतेची व शेतकऱ्यांची तहान भागवली यामुळे येथील जनतेला सर्व ज्ञात असून विधानसभा मतदान दिनाची आतुरतेने वाट पाहत आहेत प्रशासकीय यंत्रणेवर नाहक दबाव टाकत खटाव तालुक्याला वेठीस धरले मात्र आता जनता सुज्ञ झाली असून यापुढे कोणत्याच भुलभुलैयाला आणि नौटंकीला थारा देणार नाही हे निश्चित.

**काँग्रेस सर्वसमावेशक पक्षः- रणजितसिंह देशमुख**

**राष्ट्रीय काँग्रेस पक्ष हा सर्व घटकांना समान न्याय देऊन सबलीकरण करून प्रतिनिधित्व काम करणारा पक्ष आहे.**

**काँग्रेस पक्ष कधीच लोकांच्यात फूट पाडण्याचा प्रयत्न करत नाही.**

**त्यामुळे सर्वांनी काँग्रेस पक्षाच्या पाठीशी उभे राहावे असे आवाहन रणजितसिंह देशमुख यांनी केले. यावेळी प्रास्तावीक राजुभाई मुलाणी यांनी केले तर आभार डॉ.महेश गुरव यांनी मानले.यावेळी अमर कांबळे,सत्यवान कांबळे,माए खाडे,मुबारक मुल्ला,धनंजय निंबाळकर,संतोष जाधव,दादा सुर्यवंशी,अरविंद गायकवाड,परेश जाधव,ड.पी.डी.सावंत,किसनराव सानप,बोटे सर,श्रीरंग देवकर,मधुकर देवकर,दिनकर देवकर,किशोर ढोले,अभिजीत साबळे,सदाशिव खाडे,डॉ.नितीन जगदाळे,डॉ. नारायण जाधव व कार्यकर्ते उपस्थित होते.**

# साताऱ्यात पोलीस भरतीसाठी आलेल्यांची पावसाने मंदावली पावले

**सातारा :** सातारा पोलीस दलाच्या वतीने बुधवार दिनांक १९ जून पासून भरती प्रक्रिया राबवण्यात येत आहे. पण काल दुपारी तीन वाजल्यापासून कोसळणाऱ्या पावसामुळे पोलीस भरतीसाठी शारीरिक चाचणी देताना अनेक उमेदवारांच्या पावलाची गती मंदावली आहे. या परीक्षा पुन्हा घेण्याची मागणी उमेदवारांकडून होऊ लागलेली आहे.

पाऊले चालली पंढरीची वाट या उक्तीप्रमाणे आषाढी एकादशी पूर्वीच वारकरी सज्ज झाले असतानाच सातारा पोलीस दलातही भरती होण्यासाठी पाऊले चालली कवायत मैदानावर चाचणीची वाट.... असे त्याचे वर्णन होऊ लागलेले आहे. पण, पावसामुळे यामध्ये व्यत्य आलेले आहे.

सातारा जिल्हा पोलीस दलाच्या वतीने पहिल्या दिवशी एक हजार उमेदवारांचे वजन, उंची हे शारीरिक मोजमाप व इतर मैदानी चाचणी घेण्यास सुरुवात झाली होती. बायोमेट्रिकचा वापर करून ही प्रक्रिया राबवण्यात येत असतानाच अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे उमेदवारांच्या धावण्याची गती अक्षरशः मंदावलेली आहे. पोलीस कवायत मैदानावर अनेक ठिकाणी पाणी व चिखलमातीचे थर साचल्यामुळे शहरी व ग्रामीण भागातून आलेल्या उमेदवारांना धावताना अनेक अडचणी येत होत्या. पोलीस शिपाई बँड वादक या पदासाठी २३५ जागांसाठी तेरा हजार उमेदवारांनी अर्ज दाखल केले आहेत. या पदासाठी सकाळी पाच वाजल्यापासून सातारा पोलीस कवायत मैदानावर युवक व तरुण सर्व कागदपत्र व शारीरिक चाचणीसाठी जय्यत तयारी करत आहेत.



**सातारा पोलीस कवायत मैदानाची झालेली अवस्था (छाया- अजित जगताप, सातारा)**

काल कोसळणाऱ्या पावसामुळे उच्च पदवीधर त्याचबरोबर विविध क्षेत्रांमध्ये नोकरीसाठी प्रयत्न करणारे युवक व तरुण सुद्धा या पोलीस भरती मध्ये सहभागी झाले होते. पत्रकारिता पदविका अभ्यासक्रम पूर्ण केलेले व स्पर्धा परीक्षेची तयारी करणारे ही हुशार विद्यार्थी आणि उमेदवारसुद्धा नोकरीची खात्री म्हणून भरती साठी आले होते. त्याचबरोबर अभियंता व इतर गोष्टींचे पदविका घेऊन आयुष्यभर आता पोलीस दलात बँड वाजवण्यासाठी वादक म्हणून तयार झाले आहेत. उमेदवाराची पात्रता पाहून गुणवत्तेनुसार त्यांना पुन्हा लेखी परीक्षेसाठी बोलवण्यात येणार आहे. यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. ही प्रक्रिया छत्रपती शाहू महाराजांच्या जयंती दिली म्हणजे दिनांक २६ जून पासून सुरू होणार आहे.

सातारा जिल्हा पोलीस दलाच्या कवायत मैदानावर काल कोसळणाऱ्या पावसामुळे अनेक उमेदवार चिंताग्रस्त झाले होते. भरती प्रक्रिया पूर्वी अनेकांनी जय्यत तयारी करताना उघड्या मैदानावर व डोंगर माथा, रस्त्यावर तयारी केली होती. पण चिखल व पाणी साचलेल्या मैदान व रस्त्यावर कुणीच तयारी केली नसल्यामुळे त्यांना परीक्षा देताना त्यांच्या पायाची गती मंदावली होती. याचा विचार करून पोलीस दलातील ही भरती प्रक्रिया वातावरण पाहून पुन्हा घ्यावी. अशी मागणी सातारा जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे सामाजिक कार्यकर्ते श्री दत्ता केंगार, विकास भिलारे, रविंद्र जगताप व साताऱ्यातील ॲड .विकास पवार यांनी केलेली आहे.

सातारा पोलीस कवायत मैदानावर काल दुपारी तीन वाजेपर्यंत ७२० भरतीसाठी आलेल्या उमेदवारांची वजन, उंची मोजमाप व वैद्यकीय प्राथमिक चाचणी घेण्यात आली.

अचानक कोसळणाऱ्या पावसामुळे चाचणीच्या प्रतीक्षेत असणाऱ्या उमेदवार व त्यांचे नातेवाईक यांना भिजतच उभे राहावे लागले. यामुळे अनेक जण गारठून गेले होते. काही उमेदवारांची गोळा फेक,१०० मीटर व सोळाशे मीटर धावणे. असे मैदानी प्रकार झाले. उर्वरित उमेदवारांना मैदानाची परिस्थिती पाहून त्यांची चाचणी घ्यावी. कारण, पोलीस कवायत मैदानावर सर्वत्र चिखल व पाणी साचल्यामुळे भरती प्रक्रियेसाठी पारदर्शक पणाने काम करणाऱ्या पोलीस दलातील कर्मचाऱ्यांना सुद्धा त्याचा त्रास होऊ लागलेला आहे.

गेली वर्षभर पहाटे लवकर उठून पोलीस भरतीसाठी प्रयत्न करणाऱ्या अनेक युवकांना निसर्गानेच साथ द्यावी. यासाठी प्रार्थना केली जात आहे. अनेकांच्या कागदपत्रे तसेच कपडे व सोबत आलेले बूट पावसामुळे भिजल्याने त्यांना चाचणी देताना अडचणी येत आहेत. याची वरिष्ठांनी जाणीव ठेवून भरती प्रक्रिया थांबवावी व वातावरणातील बदल लक्षात घेऊन सोयीनुसार बदली प्रक्रिया राबवली तर खऱ्या अर्थाने गुणवत्तेला वाव मिळेल असे स्पष्ट करण्यात आलेले आहे. दरम्यान ,निवडणूक प्रचारासाठी युवक व तरुणांचा वापर केला जातो. तर दुसऱ्या बाजूला साताऱ्यात या भरती प्रक्रियेच्या उमेदवारांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी कुठल्याही राजकीय पक्षाचा नेता अथवा लोकप्रतिनिधी उपस्थित राहू शकला नाही. याचा आता युवक व तरुण विचार करू लागलेले आहेत.

## आयआरबी इमारतीच्या तळमजल्यावर आढळला पुरुष जातीचा मृतदेह

**कोल्हापूर :** कोल्हापुरातील विक्रमनगर इथल्या आयआरबी इमारतीच्या तळमजल्यावर साचलेल्या पाण्यात एका माणसाचा मृतदेह आढळून आलाय. या मृतदेहाची ओळख पटलेली नसून याची नोंद राजारामपुरी पोलिस ठाण्यात करण्यात आलीय.

विक्रमनगर इथं आयआरबी कंपनीची पाच मजली इमारत आहे. गेल्या अनेक महिन्यांपासून ही इमारत वापराविना पडून आहे. काल सायंकाळच्या सुमारास या इमारतीमधून दुर्गंधी पसरू लागल्यानं परिसरातील नागरिकांनी इमारतीत जाऊन बघितल्यानंतर इमारतीच्या तळमजल्यावर साचलेल्या पाण्यात एका माणसाचा मृतदेह तरंगत असल्याचं त्यांच्या निदर्शनास आलं. स्थानिकांनी तात्काळ याची माहिती राजारामपुरी पोलिसांना दिली.



# विविध कला-क्रीडा प्रकारात घवघवीत यश मिळवण्यासाठी योगाचे सर्व प्रकार महत्वाचे : योगेश बोबडे

**टेंभुर्णी :** विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासोबतच त्यांना भावी काळात येणा-या विविध कला-क्रीडा प्रकारात घवघवीत यश मिळवण्यासाठी योगाचे सर्व प्रकार आत्मसात करून सातत्य टिकवल्यास यश नक्कीच मिळणार असे मत जिल्हा नियोजन समितीचे सदस्य,सरपंच प्रतिनिधी योगेश बोबडे यांनी मांडले ते श्री माऊली शिक्षण प्रसारक व समाजसेवा मंडळ यांचे वतीने योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

योगदिनाची सुरूवात जिजाऊ व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिथींचे वृक्ष व ग्रंथ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी योगाचार्य परमेश्वर सुरवसे सरांनी योगाचे मनवी जीवनातील महत्व आणि निरोगी जीवन जगण्याचा मूलमंत्र विद्यार्थ्यांना दिला. सोबतच हसतखेळत विविध योगासने व त्याची प्रात्यक्षिकही करुन दाखविली याचा विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. यावेळी योगाचार्य परमेश्वर सुरुवसे, सत्यवान पराडे, प्राचार्य विकास करळे,पीआरओ सागर खुळे व इतर मान्यवर उपस्थित होते. सूत्रसंचालन वजाळे प्रास्ताविक अमर काळे तर आभार अडाणे यांनी केले. यावेळी संस्थेतील प्रशिक्षक, सर्व शिक्षक व शिक्षिकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले. यावेळी पालकवर्गही मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## शिवाजी स्टेडियम येथील जलतरण तलावासाठी ३५ लाखाची तरतूद करा : आमदार जयश्री चंद्रकांत जाधव

### जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना केली सूचना


**कोल्हापूर :** छत्रपती शिवाजी स्टेडियम येथील जलतरण तलावाचा सर्वांगीण विकासाठी ३५ लाख रुपय निधीची तरतूद करावी अशी सूचना आमदार जयश्री चंद्रकांत जाधव यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना केली.

कोल्हापूर उत्तर विधानसभा मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकास कामाबाबत आज आमदार जयश्री जाधव यांनी जिल्हाधिकारी अमोल येडगे यांची भेट घेऊन चर्चा केली.

आमदार जयश्री जाधव म्हणाल्या, छत्रपती शिवाजी स्टेडियम कोल्हापूरची अस्मिता आहे. स्टेडियमचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. यामुळे शिवाजी स्टेडियम मधील मैदानाचे सपाटीकरण आणि ड्रेनेज लाईनच्याकामासाठी एक कोटी ९४ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे. याचे काम सध्या सुरू आहे. त्याचबरोबर छत्रपती शिवाजी स्टेडियम येथील जलतरण तलावाची दुरावस्था झाली आहे. यामुळे अनेक जलतरणपटू सराव करताना जखमी झाले आहेत, अशा तक्रारी जलतरणपटू व नागरिकांनी माझ्याकडे केली आहे.

सर्वसामान्य नागरिकांसाठी हक्काच्या असणाऱ्या जलतरण तलावाचा सर्वांगीण विकास होणे गरजेचे असून त्यासाठी ३५ लाख रुपयांचा निधी निधीची मागणी यापूर्वीच केली होती. मात्र याबाबत अद्याप निधीची तरतूद झालेली नाही. तरी छत्रपती शिवाजी स्टेडियम येथील जलतरण तलावाच्या सर्वांगीण विकासासाठी त्वरित निधीची तरतूद करावी व तलावाच्या सर्वांगीण विकासाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे, अशी सूचना जिल्हाधिकारी अमोल येडगे यांना केली आहे.

# ३६ वर्षानंतर जिर्ण झालेली पाण्याची टाकी जमिनदोस्त



**पाण्याची टाकी उभी असताना व जमीन दोस्त असताना**

**नारायणगाव :** जुन्नर तालुक्यातील नारायणगाव ग्रामपंचायत च्या वतीने दि. १८ एप्रिल १९८८ रोजी उद्घाटन झालेल्या जल पाणीपुरवठा योजनेची जुनी झालेली मोठी टाकी आज जमीन दोस्त करण्यात आली.

या टाकीची जीर्ण अवस्था पाहून नारायणगाव ग्रामपंचायत च्या वतीने ही टाकी जमीनदोस्त करण्याचा निर्णय घेण्यात। आला होता या अनुषंगाने आज दि. २१ जून रोजी वटपौर्णिमेच्या मुहूर्तावर ३६ वर्षानंतर ही पाण्याची टाकी पाडण्यात आली. तत्कालीन जिल्हा परिषद अध्यक्ष रमेशचंद्र ढमाले, तत्कालीन खासदार स्वर्गीय रामकृष्ण मोरे यांच्या हस्ते या टाकीचे उद्घाटन करण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन आमदार स्वर्गीय वल्लभ बेनके यांच्या प्रमुख उपस्थितीत तसेच पंचायत समितीचे माजी सभापती शिवाजीराव खैरे यांच्या साक्षीने या पाणीपुरवठा योजनेचे उद्घाटन करण्यात आले होते.

आज टाकी पाडण्याच्या ऐतिहासिक क्षणा प्रसंगी नारायणगाव ग्रामपंचायत चे उपसरपंच योगेश बाबू पाटे, ग्रामविकास अधिकारी नितीन नायकरे, तंटामुक्तीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर औटी, ग्रामपंचायत सदस्य गणेश पाटे, हेमंत कोल्हे, माजी उपसरपंच संतोष दांगट, आरिफ आतार, माजी सदस्य बाळा वाव्हळ, विकास तोडकरी, भागेश्वर डेरे, नंदू अडसरे, तौसिफ कुरेशी, सकलेन आतार, गौतम औटी, अमोल औटी, ग्रामपंचायतचे कर्मचारी बाळासाहेब आवटे मच्छिंद्र जगताप, गोपी खंडे, राजेश हांडे, वायरमन शिंदे, अजहर शेख, फुरकान इनामदार, बाळू मंडले व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## भाजपा सातारा लोकसभा आढावा बैठक संपन्न पदाधिकाऱ्यांच्या भावना प्रदेशाध्यक्षांच्या पर्यंत पोहोचवणार :- योगेशअण्णा टिळेकर

**सातारा :** भारतीय जनता पार्टी महाराष्ट्र प्रदेश त्या बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रत्येक विधानसभा मतदारसंघासाठी , प्रदेश पातळीवरील पदाधिकारी प्रभारी म्हणून नेमून त्यांना लोकसभेतील प्रत्येक विधानसभा क्षेत्राच्या अंतर्गत येणाऱ्या प्रदेश, जिल्हा , मंडल पदाधिकारी ,आघाड्या मोर्चाचे प्रदेश , जिल्हा , मंडल पदाधिकारी यांच्याकडून लोकसभेत केलेल्या कामाचा आढावा घेण्याची जबाबदारी देण्यात आलेली होती

सातारा लोकसभेसाठी माजी आमदार योगेशअण्णा टिळेकर यांची नियुक्ती करण्यात आली होती, भाजपा सातारा जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी माजी आमदार योगेशअण्णा टिळेकर यांचे स्वागत केले आणि बैठकीचे प्रास्तविक केले.

# शिवचरित्र वर्तमानात जगलो तर भविष्यकाळ उज्जवल : प्रा.डॉ.बाबर

**सातारा :** छत्रपती शिवराय हा आमचा भूतकाळ नाही तर छत्रपती शिवराय हा आपला वर्तमानकाळ असला पाहिजे. तेच शिवचरित्र आम्ही जर वर्तमानात जगलो तर आमचा येणारा भविष्यकाळ नक्की उज्वल असेल. आयुष्यातल्या प्रत्येक टप्प्यावर त्यांचा आदर्श घेऊन आपण चाललो तर कुठल्याही संकटांना तोंड देण्याची क्षमता आपल्यात निर्माण होईल, असे मत प्रेरणादायी व्याख्याते प्रा. डॉ. विनोद बाबर यांनी व्यक्त केले. शिवराज्याभिषेक दिन सोहळा निमित्त शिवराज्याभिषेक उत्सव समिती,राजधानी सातारा व सातारा नगरपालिका सातारा आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी स्वागत अध्यक्ष विनोद कुलकर्णी, अध्यक्ष राजू गोरे, नितीन शिंगटे, अनंतराव जोशी, नंदकुमार सावंत, रवींद्र माने, अमर बेंद्रे, रवींद्र भारती, मुकुंद आफळे, जयंत देशपांडे,अजिंक्य गुजर, उमेश जगताप,अभिजीत बारटक्के व मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना प्रा. डॉ. बाबर म्हणाले, जगात अनेक राजे-महाराजे होऊन गेले पण त्यांचे नाव आज कोणीही घेत नाही. परंतु छत्रपती शिवाजी महाराज असे एकमेव राजे आहेत. पावणे चारशे वर्ष झाले तरी आज येथील जनतेच्या हृदयावर छत्रपती शिवराय जिवंत आहेत. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी शून्यातून विश्व निर्माण केले. स्वराज्यावर कुठले संकट आले तर ते घाबरले नाहीत, स्वतःहून पुढे जाऊन लढले. वतनदाराचा मुलगा ते स्वराज असा इतिहास अवघ्या ३५ वर्षात त्यांनी उभा केला. भारतातील असा एकमेव राजा होता त्यांच्यासाठी मावळे मरायला तयार होते. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे राज्य निर्माण केले होते. मोबाईलच्या अतिवेडेपणामुळे युवा वर्गाचे जगणे, मरणे मोबाईल ठरवू लागला आहे. आमचे आदर्श चुकीचे ठरत आहेत. सोशल मीडियावर जे दिसते ते आमचे आदर्श असता कामा नयेत.

छत्रपती शिवाजी महाराज, धर्मवीर संभाजीराजे इतिहास निर्माण करणारी ही माणसे आहेत. त्यांचा आदर्श हवा. त्यांचा इतिहास मुलांमध्ये रुजवला तरच ते घडतील.